




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ३४३ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## आता बोला...




# धार्मिक स्वातंत्र्यात राज्याचा हस्तक्षेप अयोग्य

## सुप्रीम कोर्ट : यूपीच्या धर्मांतर कायद्यावर प्रश्न उपस्थित



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

उत्तर प्रदेश बेकायदेशीर धर्मांतर प्रतिबंधक कायदा, २०२१ च्या काही कलमांबाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की हा कायदा एखाद्या व्यक्तीच्या धर्मांतराची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि त्रासदायक बनवतो. प्रयागराज येथील शुआट्स विद्यापीठाच्या कुलगुरूंविरुद्ध जबरदस्तीने धर्मांतर केल्याच्या आरोपाखाली दाखल केलेला एफआयआर रद्द करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाचा सविस्तर आदेश आता जारी करण्यात आला आहे.

न्या. जे.बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, संविधानानुसार, भारतीय नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, श्रद्धा आणि उपासनेचे स्वातंत्र्य हमी आहे. हे स्वातंत्र्य देशाच्या धर्मनिरपेक्षतेचे वैशिष्ट्य आहे. न्यायालयाने म्हटले आहे की कायद्यानुसार कोणत्याही धर्मांतर करण्यापूर्वी आणि नंतर जिल्हा दंडाधिकाऱ्यांना माहिती देणे आवश्यक आहे. त्यानंतर दंडाधिकाऱ्यांना पोलिस चौकशीचे आदेश द्यावे लागतात. ही प्रक्रिया राज्य हस्तक्षेप दर्शवते, एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक धार्मिक निवडीमध्ये हस्तक्षेप करते.

'लव्ह जिहाद' कायद्याच्या वैधतेला आव्हान देणारा असाच खटला गुजरात हायकोर्टात प्रलंबित असल्याचे कोर्टाने नमूद केले.

बळजबरी, प्रलोभन किंवा फसवणूक न करता होणाऱ्या धर्मांतरांशी संबंधित आंतरधर्मीय लग्न कायद्यातील तरतुदी लागू करू नयेत असा अंतरिम आदेश जारी केला.


## गोपनीयता अन् वैयक्तिक स्वातंत्र्यावर भर

के.एस. पुट्टास्वामी व शफीन जहाँ यांच्या खटल्यांचा हवाला देत न्यायालयाने म्हटले की कलम २५ मध्ये गोपनीयतेचा अधिकार देखील समाविष्ट आहे. व्यक्तींना धर्म व श्रद्धा निवडण्याचे, त्या सार्वजनिकरित्या व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. लग्नासारख्या बाबींमध्ये वैयक्तिक स्वायत्तता सर्वोपरि आहे.

# तापमान वाढल्याने राज्यात ४ दिवस वादळी पावसाचा अंदाज

**पुणे-छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

यंदा मे महिन्याच्या प्रारंभापासून कोसळत असलेला पाऊस महाराष्ट्राचा पिच्छा सोडण्यास तयार नाही. मान्सून माघारी गेला असला तरीहिंदी महासागर, बंगालच्या उपसागरात पाण्याचे तापमान वाढले आहे. परिणामी राज्यात येते ४ दिवस विजेच्या कडकडाटासह वादळी पावसाचे असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले. तत्पूर्वी लक्ष्मीपूजनानंतरचे दोन दिवस म्हणजे २३, २४ ऑक्टोबर रोजी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत जोरदार सरी कोसळल्या. २५ ते २७ ऑक्टोबर छत्रपती संभाजीनगरात पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे म्हणाले, २८ ऑक्टोबरपर्यंत उत्तर विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात गडगडाटीसह मध्यम पावसाची शक्यता जाणवते. अरबी समुद्रातील न्यून दाबाचे क्षेत्र ताशी २० किमी वेगाने उत्तर पूर्वेकडे प्रवास करीत आहे. यामुळे गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळात पावसाचा मारा होत आहे. शुक्रवारी हे क्षेत्र पूर्व मध्य अरबी समुद्रात होते. पुढील २४ तास त्याचा प्रवास असाच सुरू राहणार



■ मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत गेल्या दोन दिवसांत जोरदार सरी

आहे. दुसरीकडे दक्षिणपूर्व बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र असून याचा प्रभाव येत्या २४ तासात वाढणार असून, ते उत्तर पश्चिमेकडे भारतीय किनारपट्टीकडे प्रवास करणार आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी पावसाने हजेरी लावली. बीड जिल्ह्यात २ तास मुसळधार, तर उंडणगावात (ता. सिल्लोड) तासभर पाऊस झाला. सोयगाव, घाटनांद्रा परिसरातही पाऊस झाला. नांदेड शहरासह जिल्ह्यात सायंकाळी जोरदार हजेरी लावली. जवळपास तासभर झालेल्या या पावसाने शहरातील रस्त्यांवर पाणी साचले होते. हिंगोली शहरासह जिल्ह्यातही मुसळधार पाऊस झाला.

## थोडक्यात...

### मदतीची अनेक शेतकऱ्यांना अद्यापही प्रतीक्षाच

**बीड (समर्थ गांवकरी) :** जिल्ह्यात सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये अतिवृष्टीनेशेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासनानेशेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी मदतीच्याघोषणांचा पाऊस पाडला. दिवाळीपूर्वी नुकसानझालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात कोणतीही प्रक्रियान करता प्रतिगुंठा 85 रुपये प्रमाणे हेक्टरी 8500रुपये मदत मिळेल, असे जाहीर केले. मात्र मदतमिळालेल्या 90 टक्के शेतकऱ्यांना 85 रुपयेप्रतिगुंठ्यापेक्षा कमी मदत मिळाली आहे. एवढीकमी मदत कशी मिळाली ? याचे उत्तर मात्रअधिकाऱ्यांकडेही नाही. बीडसह राज्यातअतिवृष्टी, महापुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी 31,628कोटींचे पॅकेज 7 ऑक्टोबर रोजी जाहीर केले.बीड जिल्ह्यातील 8 लाख 72 हजार 884शेतकऱ्यांसाठी 634.51 कोटींचे अनुदान मंजूरझाले. हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर 21ऑक्टोबरपासून पडायला सुरुवात झाली आहे.ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत मिळाली आहे.अशा खात्यावर होल्ड लावू नये, असे आदेशजिल्हाधिकारी जॉन्सन यांनी काढले आहेत.

# गेवराईत माजी मंत्री बदामराव पंडित भाजपच्या गोटात

**गेवराई : (समर्थ गांवकरी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचीतयारी सुरु होताच आता राजकीयहालचाली वाढल्या आहेत. अशातचगेवराई येथील माजी मंत्री बदामराव पंडितयांनी ऐन दिवाळीत भाजपत प्रवेशकरण्याची घोषणा करत धमाका केलाआहे. गेवराईत आधीच भाजपत असलेलेबाळराजे पवार व माजी आमदार लक्ष्मणपवार यांच्यासोबत जळवून घेत काम करु,असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे पवार-पंडित यांच्या एकत्रित येण्यामुळे अमरसिंहपंडित, आ. विजयसिंह पंडित या बंधूंसमोरआव्हान निर्माण झाले आहे. नगरपालिकाताब्यात घेण्याचा चंग बांधलेल्या या बंधूंचाआता निवडणुकीत कस लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्याप्रक्रियेला जसा जसा वेग येत आहे. तसेतसे राजकीय वातावरण गरम होत आहे.राजकीय पक्षांकडून



■ बाळराजे पवारांसोबत जुळवून घेत अमरसिंह पंडितांसमोर निर्माण केले आव्हान

कार्यकर्त्यांच्या बैठकाघेतल्या जात आहेत तर राजकीय नेतेहीसोयीनुसार आता पक्षांत्तर करु लागलेआहेत. अनेक नेते विविध पक्षांच्यासंपर्कात आहेत. मात्र पक्षांतराच्या थेटपहिल्या घोषणेचा धमाका उडाला तोगेवराईतून. माजी मंत्री बदामराव पंडित यांनीऐन दिवाळीत आपण मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांच्या उपस्थितीत व पंकजामुंडेंच्या नेतृत्वात भाजपत प्रवेश करणारअसल्याचे दिवाळी पाडव्याच्या स्नेहमिलनकार्यक्रमात जाहीर करुन टाकले.

# प्रेयसीवर चाकूहल्ला करून तरुणाने केली आत्महत्या

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईच्या भायखळा परिसरात शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास एका २४ वर्षीय तरुणाने ब्रेकअपनंतर प्रेयसीवर चाकूने हल्ला केला. त्यात ती गंभीर जखमी झाली. नंतर या तरुणाने स्वतःचा गळा चिरला. त्यात त्याचा मृत्यू झाला. काळाचौकी भागातील नर्सिंग होममध्ये ही भयंकर घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काळाचौकी येथील रहिवासी सोनू बरईचे २४ वर्षीय मनीषा यादवसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, तो तिच्यावर वारंवार संशय घेत होता. त्यावरून त्यांच्यात जोरदार खटके उडाले. दोन आठवड्यांपूर्वी त्यांचा ब्रेकअप झाला. तेव्हापासून तो संतापाने धुसफुसत होता. शुक्रवारी सकाळी त्याने काळाचौकी येथे मनीषाला भेटायला बोलावले. तो सोबत स्वयंपाकघरातील चाकू घेऊन आला होता. मनीषा येताच त्याने तिच्यावर चाकूने सपासप दोन ते तीन वार केले.

# ब्लॅक लिस्टसह शिधा पत्रिका पडताळणीचे निर्देश

## बांगलादेशी घुसकोरांना बसणार आळा : फडणवीस सरकारचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात वाढत असलेल्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांवर नियंत्रण मिळवण्यासाठी फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित विभागांना बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांची ब्लॅकलिस्ट तयार करण्याचे आणि शिधापत्रिकांची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय, राज्य शासनाने नवीन शिधापत्रिकेसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना देखील जारी केल्या आहेत. राज्यात वाढत असलेल्या बांगलादेशी स्थलांतरितांमुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षा धोक्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीचे निर्देश जारी केले आहेत. यानुसार, बेकायदेशीर स्थलांतरितांची माहिती तात्काळ दहशतवाद विरोधी पथकाकडे पाठवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांच्या



विषयावर राज्य शासनाने अंतर्गत विचारमंथन सत्रांचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत आणि या चर्चेचा अहवाल दहशतवाद विरोधी पथकाकडे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, अशा स्थलांतरितांची ब्लॅक लिस्ट तयार करून त्यांना कोणत्याही शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

## सातारा डॉक्टर आत्महत्या प्रकरण

# दानवेंचे खासदार निंबाळकरांवर गंभीर आरोप

### पोलिस अधिकाऱ्याच्या निलंबनाची केली मागणी

**छत्रपती संभाजीनगरः (समर्थ गांवकरी)**

साताऱ्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी गंभीर आरोप केले आहेत. माजी खासदार रणजित निंबाळकर, त्यांचे बंधू आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सचिन कांबळे हे तिघे मिळून फलटणमधील सरकारी यंत्रणा चालवतात, तसेच अधिकाऱ्यांवर चुकीची कामे करण्यासाठी दबाव आणतात, असा आरोप दानवे यांनी केला आहे. याशिवाय, त्यांनी पोलिस निरीक्षक महाडिक यांच्यावरही या प्रकरणी आरोप केले आहेत.


अंबादास दानवे म्हणाले, फलटण आत्महत्या प्रकरणातील युवतीवर राजकीय आणि पोलिस अधिकाऱ्यांचा दबाव होता. महाडिक नावाच्या पोलिस निरीक्षकाचा त्यामध्ये समावेश आहे. त्याची 15 दिवसांपूर्वी नंदुरबारला बदली झाली आहे. त्याच्याकडे सदर डॉक्टर तरुणीचा तक्रार अर्ज आला होता. मात्र त्याने त्या तक्रारीला केराची टोपली दाखवली. त्याच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करा. त्याने त्याचवेळी सदर अर्जाची दखल घेतली असती तर आज तिचा जीव वाचला असता.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, माजी खासदाराचा भाऊ अभिजीत निंबाळकर हा त्या ठिकाणी यंत्रणा चालवतो. अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, त्यांना चुकीची कामे करायला लावणे हे धंदे करतो. त्याला साथ राष्ट्रवादीच्या सचिन कांबळे पाटील या आमदाराची आहे. त्या निंबाळकरच अधिकारांच्या दालनात काय काम असतं? या तिघांवर कारवाई करा. हे तिघे त्याठिकाणी यंत्रणा चालवत होते आणि चुकीची कामे करत होते.

सचिन कांबळे पाटील हे अजित पवारांचे आमदार नाहीत, ते नावाला राष्ट्रवादीत आहेत. ते सगळे काम भाजपचे करतात असा आरोप अंबादास दानवे यांनी केला. ते म्हणाले की, आमदार सचिन कांबळे पाटील, माजी खासदार रणजित निंबाळकर आणि त्यांचा भाऊ अभिजीत निंबाळकर हे अधिकाऱ्यावर दबाव टाकतात आणि चुकीची कामे करायला लावतात. पोस्ट मार्टम सर्टिफिकेट त्यांच्या सोयीने द्या, चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल करा, राजकीय कार्यकर्त्यांवर चुकीची कलमे लावा असले उद्योग करत होते, असा आरोप दानवे यांनी केला आहे.



पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, या तिघांनी वाठार निंबाळकर वाखरी येथे उत्खनन केलेले नसताना देखील एका शेतकऱ्यावर एक कोटी रुपयांचा बोजा चढवला आहे. याला जबाबदार कोण? रणजित निंबाळकरांनी शरद पवारांची राष्ट्रवादी, आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते आणि आमच्या शिवसेनेचे कार्यकर्ते यांच्यावर चुकीच्या प्रकारे गुन्हे दाखल केले आहेत, असाही आरोप दानवेंनी केला.

# प्रतिष्ठा महिलांच्या हाती



## संपादकीय

क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या देशांमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) एक वेगळेच वलय आहे. सर्वाधिक श्रीमंत क्रिकेट मंडळ असा बीसीसीआयचा जगभरात नावलौकिक आहे. भारतीय क्रिकेट संघामध्ये सुरुवातीपासूनच अनेक नावलौकिक प्राप्त खेळाडूंचा समावेश राहिला आहे. क्रिकेट खेळातील अनेक विक्रम भारतीय खेळाडूंच्या नावावर आहेत. अन्य देशातील क्रिकेट खेळाडूंच्या तुलनेत भारतीय खेळाडूंना मिळणारे मानधन अधिक आहे. पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये पुरुष आणि महिला संघांच्या मानधनामध्ये विषमता होती. पण बीसीसीआयची सूत्रे जय शहा यांच्याकडे गेल्यानंतर बीसीसीआयचा चेहरा-मोहरा बदलण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. महिला क्रिकेटपटूंनाही आता पुरुष खेळाडूंच्या बरोबरीने मानधन मिळण्यास सुरुवात झाल्याने मानधनातील दुजाभाव संपुष्टात आला आहे. भारतीय पुरुष क्रिकेट संघामध्ये मागील अनेक वर्षांपासून एकाहून एक अशा अनेक मातब्बर खेळाडूंचा समावेश राहिलेला आहे व आजही भारतीय क्रिकेट पुरुष संघामध्ये समावेश होण्यासाठी कमालीची चुरस निर्माण झालेली आहे. अनेक दर्जेदार, गुणवंत खेळाडू खेळाचा क्लास असताना व दर्जांमध्ये सातत्य असताना प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. एकेकाळी डायना एडल्जी, मिताली राजसारख्या मोजक्याच खेळाडूंमुळे भारतीय महिला क्रिकेटच्या संघाची ओळख असायची, पण अलीकडच्या काळात भारतीय महिला क्रिकेट संघाने कात टाकल्याप्रमाणे प्रगती केली आहे. भारतीय महिला संघाची एक दर्जेदार संघ म्हणून ओळख होत असून एक आक्रमक चेहरा भारतीय महिला क्रिकेट संघाला प्राप्त झाला आहे. अनेक विक्रम भारतीय महिला क्रिकेटर्सच्या खात्यात जमा असून अनेक दिग्गज संघांना सामन्यांमध्ये भारतीय महिला क्रिकेटर्सने आपल्या कामगिरीच्या बळावर पाणी पाजले आहे. सध्या भारतीय क्रिकेटमधील पुरुष आणि महिला संघाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भारतीय पुरुष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाची फारशी प्रभावी कामगिरी झालेली नाही. एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत सलग दोन सामने भारताला गमवावे लागले असून मालिकाही भारताला गमवावी लागली आहे. विराट कोहली, कर्णधार शुभमन गिल या दिग्गज खेळाडूंच्या फलंदाजीतील अपयशामुळे भारतीयांची चिंता वाढली आहे. गोलंदाजांनाही फारशी प्रभावी कामगिरी करता आलेली नाही. अर्थात ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन त्यांना पराभूत करणे एक अग्निदिव्यच आहे. त्यात फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर २६५ धावांचे रक्षण करणे कोणत्याही संघातील गोलंदाजांसाठी अवघड काम आहे. त्यातल्या त्यात दुसऱ्या सामन्यामध्ये रोहित शर्माला गवसलेला सूर क्रिकेटप्रेमींना दिलासा देणारी बाब आहे. विराट कोहलीला दोन्ही सामन्यात खाते उघडता आले नाही, तर कर्णधार शुभमन गिलला दोन्ही सामन्यांतील आकडेवारी एकत्रित केली तरी २५च्या पार करता आलेली नाही.

शनिवारी, २५ ऑक्टोबर रोजी भारत व ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेतील अखेरचा सामना होत असून मालिकेतील व्हाईट वॉश टाळण्यासाठी व प्रतिष्ठा जपण्यासाठी भारताला अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्याची कामगिरी करून दाखवावी लागणार आहे. त्या तुलनेत महिला भारतीय क्रिकेट संघाची सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी नक्कीच अभिमानास्पद आहे. विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलांनी गुरुवारी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विश्वचषकांचा संभाव्य विजेता म्हणूनही आज भारतीय महिला संघाकडे पाहिले जात आहे. दोनदा उपविजेतेपद आणि तीन वेळा उपांत्य फेरी. आयसीसी महिला विश्वचषकात आजवर विजयाच्या असे जवळ येऊनही भारताला विजेतेपदाचा आनंद साजरा करता आलेला नाही.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. १८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 9 | 6 | | 2 | 3 | | |
| 2 | 6 | | | | | | | |
| 3 | | 8 | 7 | | 9 | | 2 | |
| 7 | | 2 | | 6 | | 5 | 1 | 8 |
| | | | | | | | | |
| 4 | 3 | 6 | | 1 | | 2 | | 9 |
| | 2 | | 5 | | 8 | 7 | | 6 |
| | | | | | | | 3 | 2 |
| | | 3 | 1 | | 6 | 8 | 4 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. १७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 3 | 9 | 1 | 4 | 8 | 7 | 5 |
| 8 | 5 | 1 | 7 | 6 | 2 | 9 | 3 | 4 |
| 7 | 4 | 9 | 8 | 3 | 5 | 2 | 1 | 6 |
| 9 | 3 | 8 | 1 | 4 | 6 | 7 | 5 | 2 |
| 1 | 2 | 5 | 3 | 7 | 9 | 4 | 6 | 8 |
| 6 | 7 | 4 | 2 | 5 | 8 | 1 | 9 | 3 |
| 5 | 9 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 8 | 7 |
| 3 | 8 | 2 | 5 | 9 | 7 | 6 | 4 | 1 |
| 4 | 1 | 7 | 6 | 8 | 3 | 5 | 2 | 9 |

| पंचांग | संवत्सर - विश्वावसूनाम | नक्षत्र:अनुराधा |
|---|---|---|
| २५ ऑक्टोबर २०२५ | अयन- दक्षिणायान | ०७:५१:२८ |
| रविवार | मास- कार्तिक | योग:शोभन (अहोरात्र) |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु- हेमंत | करण:वणिज १४:३५:०९ |
| कार्तिक शके | शुक्ल पक्ष | करण:विष्टि २७:४८:३५+ |
| संवत्- १९४७ | तिथि:चतुर्थी २७:४८:३५+ | सूर्य:तुला |

## उपदेशाचे डोस

### दृढ संकल्पात सर्व शक्य

आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव-जीवनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपासनानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत -वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि-विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम-उपनियमाने बांधिल नाही. याद्वारे सुख व दुःख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंतःकरण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत बिझते. साधना व साध्य दोन वेगवेळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान-स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे. जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून आपणास वाचवतो.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८५४ - चार्ज ऑफ लाईट ब्रिगेड या नावाने गाजलेल्या बालक्लाव्हाच्या लढाईत ब्रिटिश सैन्याचे शिरकाण झाले.
- २००८ - लंडनमध्ये आयोजित केलेल्या एका समारंभात अनिवासी भारतीय रणजित सिंग बक्षी यांना एशियन ऑफ दि इयर सन्मानाने गौरविण्यात आले.

### राष्ट्रीय

- १२९६ - संत ज्ञानेश्वर यांनी समाधी घेतली.
- १८९० - हरी नारायण आपटे यांच्या करमणूक साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
- २००२ - भारताच्या पंकज अडवाणींने जागतिक स्नूकरचे अजिंक्यपद मिळवले.
- २००७ - तामिळनाडुत कोईम्बतूर बॉम्बस्फोटाची सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायालयाने आणखी २० दोषींना शिक्षा ठोठावली.
- २००७ - मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध योजनांसाठी ११४ कोटी ८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यास मान्या देण्यात आली.


### जन्म

- १८२५ - योहानेस स्ट्रॉस, संगीतकार.
- १८८१ - पाब्लो पिकासो, स्पॅनिश चित्रकार.
- १८८८ - रिचर्ड एव्हलीन बेअर्ड, पृथ्वीच्या दोन्हीही भौगोलिक धृवांवरून सर्वप्रथम विमानोड्डाण करणारा.

### निधन

- १४०० - जॉफ्रे चॉसर, कँटबरी टेल्स लिहिणाऱ्या कादंबरीकार.
- १९८० - साहिर लुधियानवी, हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. १८



**आडवे शब्द**

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मंत्र
१०. अत्तराचा बोळा
११. दात घासण्याची पावडर
१२. सुसर
१३. कारखान्यातील मजूर
१५. भाऊबंदकी
१८. संगीतातील ठेका
२०. तापापूर्वीचे शहारे
२२. मत देणारा
२३. तफावत, अंतर
२४. गुरे बांधण्याचा लांब दोर
२५. मुलाची मुलगी
२६. फुरसत
२८. केर टाकण्याची जागा
३२. भिस्त
३३. माज
३४. ढग (हिंदी)
३६. पलंग, खाट
३८. सत्त्व
३९. चलनवलन
४०. स्वयंपाकाचे शास्त्र
४३. कापणे
४४. जन्म-मृत्यू
४५. विषमच्या विरुद्ध
४८. सावधानतेचा इशारा
५०. परिस्थिती
५२. सहाचा फटका
५४. पाण्याचे हवेत रुपांतर
५५. लोकांच्या मनातील विचार
५६. पाठीतील हाड
५७. केसातील कीडा
५८. अभिनेता
५९. प्रतिष्ठा
६०. वर्ष, साल
६१. प्राण्यांचे अस्त्र
६२. सुकवलेली काळी द्राक्षे
६४. रंग (इंग्रजी)
६५. समुद्र
६७. नसती जवळीक
६८. कपार
७१. मिठी
७२. वाळवी
७५. श्वापद, पशू
७६. अटीची भाषा
७७. घराची अरूंद ओसरी
७८. बहर, हंगाम

**उभे शब्द**

१. धनवान
२. गवंडी
३. बाबापुता करणे
४. यमाचे राज्य
५. संताप, क्रोध
६. गोड्या पाण्यातील एक मासा
७. असह्य वेदना, भयंकर हाल किंवा दु:ख
८. पौर्णिमा
९. माया, प्रेम, जिव्हाळा
१०. पुष्कळ
१४. कान आणि डोळे यामधला भाग
१६. उणीव
१७. शूर
१९. मध
२१. गात्रात मदन असण्याचे वय
२४. गयवया करणे
२६. नेहमी
२७. नवरदेव
२९. बाहेरख्याली
३०. केरसुणी
३१. कोवळा अंकुर
३३. मोठा तीळ
३५. बारीकसारीक
३७. संगोपन
३८. कलावंत
४०. झाडाभोवतीचा कट्टा
४१. मजबूत, दणकट
४२. किरकोळ सामान
४६. अधिक महिना
४७. सुगंध
४९. अग्नी, वणवा
५१. हत्या
५३. आश्चर्याने सर्वत्र पाहणे
५५. खानेसुमारी
५६. महिरप
५९. मीन, मत्स्य
६३. गायीचे पिल्लू
६४. सैन्याचे कडे
६६. तर्क, ठोकताळा
६८. कोळशाची पूड
६९. भीती
७०. परीध
७१. चषक
७३. खाऊचा किंवा जेवणाचा
७४. शूर

**शब्दकोडे क्र. १७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३. समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४. मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर : १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२. कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

# लिंगायत गवळी समाजाचे 'सगर महोत्सव उत्साहात

नांदेड : (समर्थ गांवकरी)



दीपावली निमित्त परंपरानुसार दरवर्षी प्रमाणे लिंगायत गवळी समाजाच्या वतीने "सगर महोत्सव" समारंभ दि. २२ ऑक्टोंबर रोजी 'यदुकुल' वजीराबाद श्री राधाकृष्ण मंदिर, हनुमान मंदिर नांदेड येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. हजारों यादव गवळी, लिंगायत गवळी, श्रीकृष्ण गवळी समाज बांधव सहभागी झाले होते. परंपरेनुसार चौधरी गोकुल बिशनकुमार यादव यांच्या हस्ते सगरची पूजा करून सगर सुरू झाले.

या कार्यक्रमात उत्कृष्ट पशु प्रदर्शन व पशुसंवर्धन करीता लिंगायत गवळी समाज बांधवा चे यथोचित सत्कार ही करण्यात आला. या प्रसंगी यादव अहीर मंडळाचे संस्थापक स्व. चौधरी शामलाल यादव ट्राफी व सन्मान-पत्र देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र यादव युवक महासभाचे प्रदेश सचिव व सामाजिक कार्यकर्ते चौधरी गोकुल बिशनकुमार यादव यांनी केले होते. या कार्यक्रमास आमदार आनंद बोंढारकर, यादव महासभा कार्याध्यक्ष नामदेवराव आयलवाड, दत्ता पईतवार,डोईफोडेजी आदि नी सदिच्छा भेट दिली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतवर्षीय यादव महासभाचे राष्ट्रीय सरचिटणीस बिशनकुमार यादव, किशोर यादव, राधाकिशन रोत्रे उपस्थित होते. कार्यक्रमात भारतभूषण यादव, गगन यादव, गोपाल यादव, डॉ.कैलाश यादव, प्रभू आप्पा आलमखाने, धोंडीबा परनकार, धोंडीबा कनबाले, नरसू आप्पा आलमखाने, चंद्रकांत जुजाराव, नंदकिशोर लुले, शिवाजी ओसेकर, महेश अष्टेकर, सदाशिव आलमखाने, शिवाजी आलमखाने, गोविंद आलमखाने, राजेश आलमखाने, बालाजी चौधरी, राजू परणकर, सुनील लुले, सतीश यादव,राजेश कुलकर्णी, विजय यादव, भावेश यादव, देवांश यादव व समाजाचे अनेक गण मान्यवरांची उपस्थिती होती.




अहिल्यानगर : डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन च्या भौतिकउपचार महाविद्यालय, विळद घाट – अहिल्यानगर आणि ग्रामपंचायत नांदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक संधिवात दिन साजरा करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...




### टू व्हीलर व फोर व्हीलर गाड्यांची गर्दी; अपघात होण्याची शक्यता

शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरी पायथ्याशी जुन्नर बस स्थानकात टू व्हीलर व फोर व्हीलर गाड्यांची गर्दी दररोज मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे एस टी बस व खाजगी गाड्या यांच्यात अपघात होण्याची शक्यता आहे. अशी चर्चा प्रवासी,विद्यार्थी व नागरिकांन मध्ये सुरू आहे. याबाबत बस स्थानकांतील चौकशी ऑफिस मधील संबंधित अधिकारी वांरवार खाजगी गाड्या बाहेर काढा असे सांगत आहे. तरीही सगळे बस स्थानकातील खाजगी गाड्या चालक दुर्लक्ष करतात असे चित्र पाहायला मिळत आहे. नारायणगाव एसटी डेपो कार्यालय येथील संबंधित अधिकारी व जुन्नर पोलीस स्टेशन येथील संबंधित अधिकारी यांनी जुन्नर बस स्थानकातील खाजगी गाड्यांकडे ताबडतोब लक्ष देणे गरजेचे आहे . येथील जुन्नर बस स्थानकातील खाजगी गाड्या लौक करून कुठेही पार्किंग करा असे सध्या चित्र झालेले आहे . याकडे संबंधित अधिकारी का ? दुर्लक्ष करतात अशी चर्चा सध्या सुरू आहे . येथील खाजगी गाड्यांना कधी आळा बसणार असा प्रश्न नागरिक, प्रवासी व विद्यार्थ्यांमध्ये आहे. जुन्नर बस स्थानकामध्ये अनेक वेळा मोबाईल , पाकिट चोरणे , महिला भगिनींचे मंगळसूत्र , सोनं व दागिने लंपास करणे असे प्रकार वारंवार घडलेली आहेत. तरीही संबंधित अधिकारी व जुन्नर पोलीस स्टेशन या खाजगी गाड्या व पोलीस बंदोबस्त याबाबत कठोर निर्णय कधी येणार आहे.



### दिवा विकास प्रतिष्ठानकडून शेकडो महिलांना भाऊबीज भेट

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा विकास प्रतिष्ठानचे संस्थापक व अध्यक्ष शैलेश मनोहर पाटील यांसकडून दरवर्षी प्रमाणे यंदाही शेकडो महिलांना भाऊबीज भेट म्हणून साडी वाटप करण्यात आले. गेली १४ वर्षापासून दिवा विकास प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा शैलेश पाटील दिवा शहरातील महिला भगिनींसाठी रक्षाबंधन व भाऊबीज मोठ्या उत्साहात साजरा करतात. यंदा देखील दीपावली निमित्त महिलांसाठी भाऊबीज भेट म्हणून दिव्यातील शेकडो महिलांना साडी वाटप करण्यात आले. समाजसेवेचा उपजत गुण त्यांच्याकडे असल्यामुळे श्री पाटील यांनी आजपर्यंत अनेक समाजकार्य करत असतात. गोरगरिबांसाठी रक्तदान शिबिरे, रोजगार मेळावा, गोरगरिबांना अन्नधान्य वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप त्याच बरोबर अनेक आरोग्य शिबीरे त्यांच्याकडून दरवर्षीच होत असतात. यातून समाजापुढे त्यांनी ऐक आदर्श मांडला आहे. या त्यांच्या कामामुळेच लहानापासून मोठ्यांपर्यंत त्यांच्यावर विशेष प्रेम व विश्वास आहे. अडचणीच्या वेळी सर्वसामान्य नागरिकांसाठी शैलेश पाटील नेहमीच तत्पर राहून कार्य करत असतात असे काही जेष्ठ महिलांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले आहे.

### मुंब्रा पोलिसांनी हरविलेले ४० मोबाईल फोन भाऊबीज दिनी केले परत



ठाणे (स. गांवकरी) : मुंब्रा पोलीस स्टेशनकडील नेमणुकीस असलेले पोशि/२५७१ सागर महांगडे, पोशि/३५२८ महेश जाधव यांनी विशेष परिश्रम करून तसेच हरविलेल्या मोबाईलचे सीडीआर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे कार्यालयातील पोना/७२६१ माळी यांचेमार्फतीने पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ तसेच सहा. पोलीस आयुक्त, कळवा, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार हरविलेले मोबाईल फोनचा CEIR पोर्टलद्वारे शोध घेवुन व सदरचे मोबाईल ट्रेस करून मोबाईल फोन संबंधीची माहिती मिळणेकरिता संबंधित मोबाईल फोन कंपनीचे सर्व्हिस प्रोव्हायडर यांचेसोबत पत्रव्यवहार करून संबंधित मोबाईल फोनबाबतची तांत्रिक माहिती प्राप्त करून घेतली व प्राप्त झालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून हरविलेले/गहाळ झालेले ४० मोबाईल प्राप्त करून घेतले आहेत. सदरचे हस्तगत करण्यात आलेले मोबाईल फोन संबंधीत मालक यांना मा. सहा. पोलीस आयुक्त, कळवा विभाग प्रिया डमाळे यांचे मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद कुंभार, पोलीस निरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) राजु पाचोरकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) नितीन पगार, सपोनि / रोहित केदार यांचे हस्ते मोबाईल हस्तांतरण कार्यक्रम मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे आयोजित करण्यात आला असुन मोबाईलधारक यांना त्यांचे हरविलेले / गहाळ झालेले मोबाईल फोन परत करण्यात आले आहेत. तसेच नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, मोबाईल फोन हरविल्यानंतर सदरचे फोन ट्रेसिंग करणेकरिता पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविलेनंतर https://www.ceir.gov.in/या वेबसाईटवर जावुन तात्काळ तक्रार नोंदवावी असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.

# राशनच्या गव्हाची अवैध वाहतूक करणारा आयशर ट्रक रामतीर्थ पोलिसांनी पकडला!

**या मार्गावर एका आठवड्यात दुसऱ्यांदा कारवाई!**

नांदेड : (समर्थ गांवकरी)

नांदेड जिल्हा जिल्ह्यात राशन तस्करीचे मोठं रॅकेट सक्रिय झाले असून. जिल्ह्याच्या विविध ठिकाण्याहून राशनचे गहू, तांदुळ जमवून नांदेडच्या नवीन मोंढा येथे साठा केला जातोय मग तांदूळ गोंदिया तर गहू तेलंगणात पुवठा केला जात आहे. अशी वाहतूक करणारे वाहन याआधी कुंटूर पोलिसांनी पकडला तर १९ सप्टेंबरला एम. एच २६ बीई ८८७४ क्रमांकचा अवैध गव्हाचा आयशर ट्रक रामतीर्थ पोलीसांनी पकडून ताब्यात घेतला आहे. अशी कारवाई पोलीस प्रशासनाकडून एका आठवड्यात दुसऱ्यांदा झाली असलीतरी. या वाहनावार पुढील कारवाईस महसूल प्रशासनात उदासीनता दिसून येते.अवैध धंदयावर जिल्हा पोलीस प्रशासनाची खडीनजर असतांना देखील जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राशन तस्करी केली जात आहे. लाभार्थ्यांना वेळेवर धान्य मिळत नाही. पण तसकारांना मात्र भरमसाठ धान्य उपलब्ध होत आहे. यामुळे जिल्ह्यात राशनचा काळाबाजार खूप मोठ्या प्रमाणात केलाजातोय. जिल्ह्यातील नायगांव, मुखेड, धर्माबाद, उमरी, भोकर, देगलूर, बिलोलीसह विविध तालुक्यातुन राशन गोळा करून नांदेडच्या नवीन मोंढा येथे साठवणूक केली जोते. तद्रंतर तांदूळ अर्धापूर



मार्गे गोंदिया जिल्ह्यात तर गहू, धर्माबाद, नायगांव, नरसी, रामतीर्थ, देगलूर मार्गे तेलंगनात पुरवठा केला जात आहे.

अशी राशनची अवैध वाहतूक होत असतांना (दि.१० सप्टेंबर रोजी रात्री कुंटूर पोलीसांनी पकडून त्याब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी नायगांव तहसील प्रशासनास पत्रव्यहवाहर केले पण गेली दहा दिवस लोटले परंतु या वाहणावर आद्यही कारवाई करण्यात आली नाही. ही कारवाई होण्या आधीचं पुन्हा दि. १९ च्या रात्रीला बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राशनच्या गव्हाची अवैध वाहतूक करणारा एमएच २६ बीई ८८७४ क्रमांकचा आईचर मिळालेल्या गुप्त माहिती नुसार उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्ग दर्शनाखाली रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहपोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी व त्यांच्या पाथकांनी रामतीर्थ हद्दीत पकडून चौकशी केली असता त्या वाहन चालकांकडे गव्हाची व वाहतुकीची कसलीही पावती आढळून आली नसल्याने हा आईचर रामतीर्थ पोलीस ठाण्यात लावण्यात आला आहे.

पुढील कारवाईसाठी बिलोली तहसील प्रशासनास पत्रव्यवहार करण्यात आले असल्याचे सपोनि हराळे यांनी सांगितले आहे. परंतु या पकडण्यात आलेल्या अवैध वाहनावर कारवाई करण्यास तहसील प्रशासणात उदासीनता असल्याचे दिसून येत आहे.

## वीर पत्नी आणि मातांसोबत आ. चिखलीकर यांनी साजरी केली भाऊबीज

नांदेड : (समर्थ गांवकरी)

भारताचे संरक्षण करताना वीरगती प्राप्त झालेल्या वीर सैनिकांच्या माता आणि पत्नी सोबत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज भाऊबीज साजरी करत वीर जवानां प्रति आपल्या सद्भावना कायम जपल्या आहेत. वसंत नगर येथील आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष निवासस्थानी ही आपुलकीची भाऊबीज साजरी करण्यात आली. भारत देशाच्या संरक्षणासाठी भारतीय सैन्य दलात आपल्या प्राणांची आहुती देऊन अजरामर झालेल्या शहीद वीर जवानांच्या प्रति नेहमीच सद्भावना जपल्या आहेत. वीर जवानांच्या कुटुंबीयांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून ते सातत्याने पुढाकार घेऊन काम करत आहेत. एवढेच नाही तर वीर जवानांच्या कुटुंबीयांसोबत सुखदुःखाच्या क्षणातही ते सोबत राहिले आहेत. याच अनुषंगाने गेल्या अनेक वर्षापासून भाऊबीज हा भारतीय स्थानातील अत्यंत महत्त्वाचा सण शहीद वीर जवानांच्या कुटुंबीयांसोबत साजरी करण्याची त्यांची परंपरा त्यांनी खंडित होऊ दिली नाही. याही वर्षी आपल्या साई सुभाष निवासस्थानी भाऊबीज निमित्त आपुलकीचा सोहळा पार पडला.

## "पुतळ्यांचे राजकारण जनता पाठीशी घालणार नाही"

- आमदार डॉ. किरण लहामटे यांची भांगरे/ विखे भेटीवर टिपण्णी
- जिल्हा परिषदेचा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचा आणि अकोलेचा होणार - आ.डॉ. लहामटे



अकोले : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद राष्ट्रवादी काँग्रेस आणि अकोले तालुक्याकडेच राहणार — असे ठाम मत राष्ट्रवादीचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी व्यक्त केले. भांगरे मायलेक आणि विखे यांच्या भेटीविषयी विचारणा केल्यावर ते म्हणाले की आंतरजातीय किंवा जातीयद्वेषी राजकारण करणाऱ्या पुतळ्यांच्या राजकारणास व दुर्भावनापूर्ण ऍट्रॉसिटींच्या गैरवापराला जनता कधीच साथ देणार नाही.

आमदार डॉ. लहामटे म्हणाले, "अकोले तालुक्यातील जनता जातीयवादी नाही — त्यामुळे पुतळ्यांचे राजकारण करणारी आणि ऍट्रॉसिटींचा गैरवापर करणाऱ्या लोकांच्या मागे जनता उभी राहणार नाही. अशी लोकं लोकहिताची कामे नसताना दहशत माजवून लोकांना घाबरवतात — त्यांना निराशा मिळेल."

त्यांनी पुढे थेट टोला लगावत म्हटले, "डुबणाऱ्या जहाजात वैभव पिचड व अमित भांगरे यांना जायचं असेल तर दोघेही डूबतील."

जिल्हा परिषद निवडणुकीबद्दल विचारल्यावर लहामटे म्हणाले की पुतळ्यांचे राजकारण, ऍट्रॉसिटींचा गैरवापर आणि दहशत पसरवणाऱ्यांना ते कधीही संधी देणार नाहीत. लोकहिताचे काम करणारा एखादा व्यक्ती जरी माझ्या विरोधात असला तरी मी त्याला माझ्यासोबत घेईल असे त्यांनी सांगितले पण दारूच्या बाटल्यांची वाटप करणारे, पैसे वाटणारे किंवा काळ्या पिशव्या वाटणारी यांना माझ्याकडे थारा नाही असेही त्यांनी नमूद केले.

माजी वर्तुळावरुन आणि स्थानिक राजकीय परिस्थितीवर बोलताना आ. डॉ. लहामटे यांनी लोकशाही आणि समावेशक राजकारणावर भर देत, अकोले तालुक्याला प्राधान्य देण्याचे आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी व तिकडेच नेतृत्व राखण्याचे संकेत दिले.

# "जेव्हा रावेरचे आमदार स्वत: कार्यकर्त्यांसाठी चहा बनवतात...

**तेव्हा त्यांच्या रूपाने मोदी चहावाले साहेबच दिसतात!"**

सेवेचा गोडवा आणि जनतेशी जोडलेपणाचा सुगंध, या दोन्ही गोष्टींचा मिलाफ त्या क्षणी झाला होता. विकासाच्या आघाडीवर काम करताना साधेपणा जपणाऱ्या अमोलभाऊ जावळे यांची ही घटना आज संपूर्ण रावेर-यावल परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे. – चंद्रकांत कोळी, रावेर

रावेर : (समर्थ गांवकरी)



रावेर-यावल मतदारसंघातील नवनिर्वाचित, जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारे तरुण व तडफदार आमदार मा. अमोलभाऊ जावळे हे केवळ राजकारणी नाहीत, तर जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारे संवेदनशील जनसेवक म्हणून परिचित झाले आहेत.

अलीकडील काही दिवसांपासून रावेर व यावल तालुक्यात मुसळधार पावसाने थैमान घातले. खरीप व बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या छटा उमटल्या. ही माहिती समजताच आमदार अमोलभाऊ जावळे यांनी कोणताही विलंब न लावता कार्यकर्त्यांसह नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

तेथे त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि तातडीने मदतीचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना धीर देऊन त्यांनी आपल्या "बळी राजाच्या" वेदना मनापासून जाणवल्या.

यावल शिवारातील दौऱ्यानंतर परतीच्या प्रवासात आमदार जावळे यांनी बोरावल दरवाज्याजवळ असलेल्या सुनिल भाऊ यांच्या चहाच्या ठेल्यावर थांबत कार्यकर्त्यांसाठी स्वतःच्या हाताने चहा बनवला. त्यांच्या हातचा "स्पेशल चहा" कार्यकर्त्यांनी आस्वादला, आणि त्या क्षणी वातावरणात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली.

त्या प्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांनी भावनिक शब्दांत म्हटले — "आमदार साहेबांच्या या साध्या पण मनाला भिडणाऱ्या कृतीत आम्हाला मोदी चहावाले साहेब दिसले!"

# सगर स्पर्धामुळे शेतकऱ्यांचा सन्मान : जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार

नांदेड : (समर्थ गांवकरी)




सगर स्पर्धा नसुन शेतकऱ्यांचा सन्मान असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जुना कौठा नांदेड येथे आयोजित अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटन महाराष्ट्र तर्फे आयोजित सगर स्पर्धा प्रसंगी केले.

अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटन महाराष्ट्र दिवाळी पाडवा निमित्ताने कै.देवरावबापु काकडे यांच्या स्मरणार्थ भव्य सगर स्पर्धा २०२५ वर्ष १८ चे आयोजन जुना कौठा नांदेड येथे २३ ऑक्टोबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व नांदेड दक्षिण आ आनंदराव बोंढारकर व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, माजी नगरसेवक राजू पाटील काळे,राजु गोरे,युवासेना जिल्हा प्रमुख गणेश पाटील शिंदे,बाळु पाटील मोरे ,शहरप्रमुख तुलजेश यादव,पांडुरंग काकडे,नंदु पाटील वैघ, अविनाश कदम,स्वराज यादव यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी उपस्थित सर्व नागरिकांना दिवाळी भाऊबिज निमित्ताने शुभेच्छा दिल्या तर आ.आंनदराव बोंढारकर यांनी सगर स्पर्धा मुळे पशुपालकांचा गौरव व शेतकऱ्यांचा सन्मान असल्याचे सांगून सहभागी झालेल्या सर्व सगर मालक व पशुपालकांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धांमध्ये नांदेड शहर सह जिल्ह्यातील अनेक भागातील सगर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते,लातुर येथील हलगीने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले, प्रारंभी स्पर्धा मध्ये सहभागी सगर यांनी हनुमान मंदिर येथे प्रदिक्षीणा घालुन सुरूवात केली,गावात महिलांसह युवक नागरिक मोठ्या संख्येने स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित होते.

संयोजक तथा प्रास्ताविक छावा मराठा युवा संघटन प्रदेशध्याक्ष पंजाबराव काळे,तर सुत्रसंचल प्रा.संदीप काळे व भरत काकडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी पैलवान रामेश्वर काळे पाटील दक्षिण विधानसभा प्रमुख व स्वराज यादव,विश्वस्त समिती यांनी परिश्रम घेतले,यावेळी पंच कमिटी यांचा सन्मान करण्यात आला.

या स्पर्धेत उत्तेजनार्थ लालु भोकरे कौठा,बबन गाढवे,जयेश यादव, यांना तर तृतीय बजु भगत,द्वितीय राजेश अल्लमखाने,तर प्रथम गणेश भुरे यांनी पारितोषिक पटकाविले विजयी स्पर्धकांना ढाल व सन्मान देऊन गौरविण्यात आले तर रूपेश गवळी यांनी सगर स्पर्धा माध्यमातून म्हैशी च्या पाठीवर पर्यावरणाचा सामाजिक संदेश दिला होता ,त्याचा हि गौरव करण्यात आला ,या वेळी समितीच्या वतीने व विजयी स्पर्धकांनी फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशाच्या गजरात जल्लोष करण्यात आला.प्रथम पारितोषिक विजेते यांना गणेश भुरे यांना युवासेना दक्षिण प्रमुख पैलवान परमेश्वर काळे पाटील यांच्या वतीने एक पोते खल्ली देण्यात आले.

# नवचैतन्य दूध डेअरीकडून दोन रुपये प्रति लिटर वार्षिक दिवाळी बोनस

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर ता:-जुन्नर येथील नवचैतन्य दूध डेअरीने सलग वर्ष भर कायम दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना पगारात कुठलीही कपात न करता अलग म्हणून दोन रुपये प्रति लिटर वार्षिक दिवाळी बोनस जाहीर केला असून पहिला टप्पा १ रुपये प्रतिलीटर प्रमाणे ३ लाख ६९ हजार ८१७ रु बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती नवचैतन्य दूध डेअरीचे सेक्रेटरी योगेश तांबे यांनी दिली. नवचैतन्य दूध डेअरीचे एकूण १०० दूध उत्पादक शेतक- री असून दररोज १२०० लिटर दूध



संकलन होते.दुधाला फॅट डिग्री नुसार ३२ ते ४० रुपये तसेच प्रत्येक पगारात बेसिक दरापेक्षा १ रुपया जादा दर दिला जातो.डेअरी कडून शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे पशुखाद्य,चारा वैरणी साठीसाठी मका,ज्वारी, घास व बियाणे दिले जाते. शेतकऱ्यांना गरजेनुसार अगाऊ उचल दिली जाते.डेअरीचा वैयक्तिक खर्च कोणत्याही शेतकऱ्याच्या बिलात कापला जात नाही.डेअरीचा काटेकोर व्यवस्थापन व स्वच्छ सुस्पष्ट व्यवहार पारदर्शक कारभार असून वर्षभरात सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या प्रथम १० शेतकऱ्यांना ट्रॉफी व सन्मान चिन्ह देऊन विशेष सन्मान केला जाणार असल्याची माहिती योगेश तांबे यांनी दिली. सन २०२४-२५ सालातील सर्वाधिक दूध पुरवठा करणारे दुध उत्पादक -१)विजय व देवराम सुदाम डुंबरे (१७५१२ लिटर), २) दिलीप तांबे (१३७५६ लिटर),३) दत्तात्रय आरोटे (१३२१६ लिटर),४) उल्हास भोरे (१२३६७ लिटर,५ तुकाराम ठिकेकर (१२००८ लिटर), ६) प्रकाश पानसरे (१०९९५ लिटर), ७)रोहिदास तांबे (९०१४ लिटर),८) वैभव तांबे (८८८३ लिटर),९) संकेत इसकांडे (८३७१ लिटर),१०) मच्छिंद्र डुंबरे (७७६३ लिटर),उत्तेजनार्थ - प्रकाश वारुळे (७६५४ लिटर), भगवान तांबे (७६७४ लिटर), मंगेश शिंगोटे (७५१० लिटर), प्रविण नलावडे (७२६२ लिटर)



नांदेड : नांदेड तालुक्यातील मरळक येथील पुरातन व जागृत देवस्थान विमलेश्वर महादेव मंदिरात संत बाबा जीवनदास महाराज यांच्या हस्ते विठ्ठल पावडे यांच्या पुढाकारातून 'एक दिवा शेतकऱ्यांसाठी' या अभियानंतर्गत महाआरती व ३००० दिवे प्रज्वलित करून शेतकऱ्यांच्या समृद्धी साठी प्रार्थना करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### जवाहर विद्यार्थी गृहात वधुवर परिचय मेळावा संपन्न

**हिंगणा (स. गांवकरी) :** जवाहर विद्यार्थी गृह वधुवर परिचय मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला १५०० च्या अधिक समाज बांधवांनी उपस्थीती दर्शविली तसेच ३०० हुन अधिक उपवर मुला मुलींनी आपला परिचय दिला. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले तसेच माकडे गुरूजी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष श्री शेखर भाऊ सावरबांधे तसेच प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री व पालकमंत्री मा.श्री.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब, श्री धर्मराजजी रेवतकर, श्री. नितीन भाऊ कुंभलकर, तेली समाज सभा नागपूर जिल्हा अध्यक्ष श्री नरेंद्रजी ढगे , उपाध्यक्ष श्री राम वंजारी उपस्थित होते. या कार्यक्रमात जवाहर विद्यार्थी गृहाचे उपाध्यक्ष श्री नरेंद्रजी दिवटे , मुख्य कार्यवाह गंगाधरजी काचोरे , कोषाध्यक्ष श्री बालानंदजी टापरे , सह- कार्यवाह श्री हर्षवर्धन बेले , जवाहर विद्यार्थी गृहाचे संचालक सुखदेव वंजारी, प्रकाश भाऊ तिळगुळे,हरिष जयपूरकर, प्रविण अंबागडे,विजय मोटघरे, नंदकिशोर थोटे, प्रज्ञा ताई बडवाईक, चंद्रकांत ढोबळे , देवेंद्र वाडीभस्मे, प्रफुल्ल रेवतकर, हरिष दांडेकर,रवि उराडे,अनिल साखरकर, कृष्णा घुग्गुसकर, लोकनाथजी भुरे ,प्रा.रमेशजी पिसे आदी उपस्थित होते. मंच संचालन हरिष जयपूरकर, प्रविण अंबागडे, सुखदेव वंजारी, नंदकिशोर थोटे यांनी केले. संस्थेचे उपाध्यक्ष श्री नरेंद्रजी दिवटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाचे समापन केले.

### विशेष कार्यकारी अधिकारी पदी विशाल बांदरे नियुक्त



**हिंगणा (स. गांवकरी) :** रायपूर येथील विशाल सेवकरामजी बांदरे यांचे सामाजिक, शैक्षणिक, कार्यकुशलतेचा , निष्ठेचा व संघटन कौशल्याचा विचार करून विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबदल विशाल बांदरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार समीर मेघे यांचे आभार व्यक्त केले.विशाल बांदरे हे मागिल तीन वर्षांपासून युवा मोर्चा भाजपा हिंगणा मंडळ उपाध्यक्ष होते. आता झालेल्या भाजपा हिंगणा मंडळ कार्यकारिणी मध्ये महामंत्री पदी निवड झाली आहे.त्यांच्या या नियुक्तीचे अध्यक्ष भाजपा मंडळ हिंगणा गजेंद्र खोबे, महामंत्री रवि जामनेरकर, महामंत्री किशोर गंधारे, महामंत्री सुचिताताई चामाटे, रायपूर सरपंच उमेश आंबटकर,वडधामना सरपंच धिरज आंबटकर,सुराबर्डी सरपंच कविता आंबटकर ,योगिता सचिन कोल्हे, दिपक ईटनकर, आदित्य मेंडजोगे,रामेश्वर धार्मिक,राजु मुसरे, हरिष आंबटकर, गुरुदास चव्हाण, मिथुन तितरे , पांडुरंग काळे,सोनाली प्रकाश लारोकर,सुरेश महाजन, प्रकाश वानखेडे, विनोद बेंबारे,सौरभ परिहार यांनी कौतुक केले.

### शिवरायांची गोष्ट म्हणजे पुन्हा शिवाजीराजे भोसले चित्रपट : मांजरेकर



**नाशिक (स. गांवकरी) :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती आणि त्यातून होणाऱ्या आत्महत्या यासारख्या संवेदनशील विषयावर भाष्य करणारा, आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी खुद्द छत्रपती शिवाजी महाराज पुन्हा एकदा भूतलावर अवतरले तर काय होईल असा विषय असलेल्या पुन्हा शिवाजीराजे भोसले चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. महेश मांजरेकर यांचे लेखन दिग्दर्शन असलेला तथा झी स्टुडिओजची प्रस्तुती असलेला पुन्हा शिवाजीराजे भोसले हा चित्रपट येत्या ३१ ऑक्टोबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे. याच निमित्ताने चित्रपटाची टीम नाशिक दौऱ्यावर आली होती. नाशिकच्या पत्रकार परिषदेत दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणाले की, "शेतकरी आत्महत्येचा विषय मला अनेक वर्षांपासून अस्वस्थ करत होता. या विषयाचा सखोल अभ्यास करताना मला जाणवलं की, यावर काहीतरी करायलाच हवं. समाजासमोर हा प्रश्न मांडायला हवा. राष्ट्रीय पुरस्कार विजेते बालकलाकार त्रिशा ठोसर आणि भार्गव जगताप यांना घेऊन एक चित्रपट करण्याचा विचार करत होतो आणि त्या प्रक्रियेत या चित्रपटाची निर्मिती झाली. सध्याच्या काळातील शेतकऱ्यांची स्थिती पाहून महाराज किती संतप्त होऊ शकतात, हे या चित्रपटात प्रेक्षकांना पाहायला मिळेल. हा चित्रपट प्रत्येक मराठी माणसाचा आहे. मुळात हा चित्रपट कोणत्याही राजकारण्यांना बोट दाखवण्यासाठी नाही, तर सर्वसामान्य नागरिकांसाठी आहे. सध्याच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा खरा अंदाज प्रेक्षकांना यातून येईल. मला विश्वास आहे की, या चित्रपटातून समाजात जागृती निर्माण होईल आणि अनेकजण पुढे येऊन मदतीचा हात देतील. हा विषय केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून देशातील अनेक भागांत अशीच परिस्थिती दिसून येते.

# नवीन ए आय तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज : चेअरमन राजेंद्र नागवडे

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

ऊस शेतीमध्ये ऊस शेतीमध्ये कमीत कमी खर्चात कमी क्षेत्रात यास उत्पन्न काढणे करिता नवीन यायचं तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची निर्माण झालेली असून त्याकरिता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात नागवडे यांनी पुढे म्हटले आहे की, दिवसेंदिवस



वाढत असलेल्या खतांच्या, औषधांच्या व बि- बियाणांच्या किमती तसेच वाढती मजुरी यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यापुढे पारंपारिक पद्धतीने शेती करणे परवडणारे नाही. त्याकरिता नव्याने आलेल्या ए आय तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आधुनिक पद्धतीने शेती करणे अनिवार्य झालेले आहे. ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी, एडीटी बारामती व साखर संघ मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने योजना राबविली जात आहे. या योजनेत कारखान्याचा सभासद असलेला शेतकरी सहभाग घेऊ शकतो. त्यासाठी ऊस पिकात ठिबक सिंचन आवश्यक असून व्हीएसआय पुणे किंवा पाढेगाव संशोधन केंद्राने प्रमाणित केलेल्या एक डोळा ऊस रोपांची लागवड करणे आवश्यक आहे. 2.5 एकर पूर्व हंगामी व सुरू ऊस लागवड केलेल्या शेतकऱ्यास या योजनेत सहभाग घेता येईल. सदर उसामध्ये अन्य कोणतेही आंतरपीक घेता येणार नाही. सदर योजनेमध्ये सहभागी होणारे शेतकरी हे पाच कि.मी. व्यासाच्या परिघात असणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांना स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे व सेंसरद्वारे आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकेल तसेच प्रत्येक क्लस्टर मध्ये कमीत कमी 25 शेतकऱ्यांचा एक गट सहभागी होणेआवश्यक आहे.

नागवडे यांनी पुढे म्हटले आहे की, या तंत्रज्ञानाकरिता प्रति हेक्टरी रुपये 25 हजार खर्च येणार आहे . त्यापैकी 15 हजार रुपये पुढील पाच वर्षाकरिता लागणाऱ्या उपकरणांकरिता असून रुपये दहा हजार ए आय नोंदणी व सेवा सल्ला शुल्क म्हणून प्रतिवर्षी खर्च येणार आहे. तथापि या योजनेत सहभाग घेणाऱ्या पहिल्या पाच हजार शेतकऱ्यांना 0 रुपये खर्च असून त्यांना व्हीएसआय मार्फत 18,250 रुपये तर कारखान्यामार्फत रुपये 6750 कर्जरुपाने बिगर व्याजी ही रक्कम उपलब्ध करून दिली जाणार आहे.

नागवडे कारखान्याच्या जास्तीत जास्त सभासद शेतकऱ्यांनी आपली ऊस उत्पादकता वाढविण्याकरिता या योजनेचा लाभ घ्यावा व त्याकरिता कारखान्याचे शेतकी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.

## हवामान बदल संकटावर 'नैसर्गिक शेती' हाच उपाय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नैसर्गिक शेती ही निसर्गाच्या नियमांवर आधारित आहे. ही शेती पध्दत पाण्याचा वापर ५० टक्क्यांनी कमी करते आणि भुजल पातळी वाढवते. नैसर्गिक शेती हा हवामान बदल या संकटावर उपाय असून शेतीमध्ये उत्पादन खर्च कमी होवून यामध्ये उत्पादन चांगले येते. जमिनीतील सूक्ष्मअन्नद्रव्यांच्या रक्षणाबरोबरच पर्यावरण,प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य, पाणी आणि माती या तिन्हींचे रक्षण करते ही पध्दती शेतक-यांसाठी फायदेशीर आहे असे राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले. राजभवन येथे नैसर्गिक शेती परिषदेत राज्यपाल आचार्य देवव्रत बोलत होते. यावेळी यावेळी या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानपरिषदेचे उपसभापती डॉ.निलम गो-हे, यांचेसह खासदार, मंत्रीमंडळातील सदस्यांची यावेळी उपस्थिती होती.

■ नैसर्गिक शेती पध्दत पाण्याचा वापर ५० टक्क्यांनी कमी करते : राज्यपाल आचार्य देवव्रत

## आउटरिच युवक कॉंग्रेस संगमनेर तालुका महासचीवपदी अमर सातपुते

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री, लोकनेते बाळासाहेब थोरात व एकविरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा तसेच संगमनेर कॉंग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका आउटरीच युवक कॉंग्रेसची कार्यकारणी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.या कार्यकारणीमध्ये कासारा दुमाला गावातील बाळासाहेब थोरात साहेबांचे निष्ठावंत युवक कार्यकर्ते अमर बाळासाहेब सातपुते यांची महासचीव पदी निवड करण्यात आली आहे. अमर सातपुते यांनी याआधी भोलेनाथ पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन,जिल्हा परिषद प्राथमीक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अशा अनेक लहान



मोठया पदांवर काम केले आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी चांगल्या पद्धतीने जबाबदारी पार पाडत एक वेगळी ओळख निर्माण केले आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रात त्यांचा चांगलाच दबदबा निर्माण झाला आहे.यामुळेच बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आउटरिच युवक कॉंग्रेस संगमनेर तालुक्यात महासचीव पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. कासारा दुमाला सह घुलेवाडी,शिंदोडी,कन्हे,आश्वी बु,वेल्हाळे,सुकेवाडी,तळेगाव दिघे, नानज दुमाला, करूले,अंभोरे,दरेवाडी, कुंभारवाडी,वरवंडी,खराडी, जाखुरी,घुलेवाडी,गुंजाळवाडी, पारेगाव गडाख, गोडसेवाडी, धांदरफळ,जोर्वे, मालुंजे या गावातीलही तरूणांच्या निवडी विविध पदांवर करण्यात आल्या आहेत. अमर सातपुते यांच्या नियुक्तीमुळे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात,विधान परिषद नाशिक पदविधर मतदार संघाचे आमदार सत्यजीत तांबे,उपसभापती नवनाथ भाऊ अरगडे, आउटरिच युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. विजय पवार,सरपंच राजेंद्र त्रिभूवन, अमृतवाहिनी बँकेचे संचालक बाळासाहेब वाळके,संजय सातपुते,अर्जुन वाळके,रामनाथ वाळके,सकाहारी सातपुते, तुळशिराम सातपुते,हरीश वाळके,शरद खतोडे, दिनानाथ नाईक,राजू गुंजाळ,संतोष वाळके,जनार्दन जाधव,अंकूश भोकनळ, दिगंबर ताजने,निलेश गुंजाळ,अजय गुंजाळ,बाळासाहेब देवकर आदी मान्यवरांनी सत्कार केला. व शुभेच्छा दिल्या.

## डीजीपी १ नगर मध्ये रंगली दीपावली पाडवा पहाट

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

डीजीपी नगर १ मध्ये पाडवा कार्यक्रम संपन्न झाला. पाडवा पहाट वर्ष २७ संगीत मैफल आज पहाटे श्री विघ्नहरण गणेश मंदिर प्रांगण, डिजीपी नगर क्र. १ येथे भव्यदिव्य वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाचे आयोजन सतिश (नाना) कुलकर्णी (मा. महापौर, नाशिक महानगरपालिका) यांच्या संकल्पनेतून झाले. सौ. संध्या अभिजीत कुलकर्णी व मा. श्री. वैभव कुलकर्णी यांच्या सहकार्याने हा संगीत सोहळा अविस्मरणीय ठरला. अमोल



पाळेकर प्रस्तुत स्वरसाधनेचा वाद्यवृंद आणि झी मराठीवरील प्रसिद्ध कलाकारांनी सादर केलेल्या गायकीने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. झी सारेगमप मराठी पर्व १८ चे महाविजेते व इंडिया आयडॉल हिंदी उपविजेते नचिकेत लेले, आम्रपाली पगारे, आसावरी बोधनकर आणि स्वरा थोरात यांनी विविध भावगीत, भक्तिगीत, चित्रपटगीत आणि रेट्रो गाण्यांनी संगीत मैफिलीत रंग भरले. या दिवाळी पाडवा पहाट मैफिलीत बहारदार गायकीने गायकांनी आणली रंगत

"आली माझ्या घरी ही दिवाळी", "तोच चंद्रमा नभात", "काळ देहासी आला खाऊ", "चाफा बोलेना", "शुक्रतारा मंदवारा" सुरत पिया की, यांसारख्या गीतांनी रसिकांना पहाटेच्या या मंगल क्षणी संगीताचा अपूर्व आनंद दिला.

वाद्यवृंद संयोजन अमोल पाळेकर यांचे होते, तर वादक म्हणून कन्हैय्या खैरनार, जयेश भालेराव, रोहित कटारे, गंगा हिरेमठ, शुभम जाधव, चैतन्य पाळेकर यांनी उत्कृष्ट साथ दिली.

निवेदन प्रणेता भाटकर यांनी केले. ध्वनी संयोजन सचिन तिडके यांचे होते.

## "चप्पा चप्पा चरखा चले"वर थिरकले नाशिककर!

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

भाऊबीजच्या पहाटे नाशिककरांसाठी संगीताचा अप्रतिम सोहळा रंगला. प्रमोद महाजन गार्डन येथे झालेल्या पारंपरिक "भाऊबीज पहाट" कार्यक्रमात यंदा पद्मश्री सुरेश वाडकर यांच्या गायकीने रसिक मंत्रमुग्ध झाले. "चप्पा चप्पा चरखा चले" या लोकप्रिय गीतावर संपूर्ण नाशिककर थिरकले. वाडकरांच्या सुरेल आवाजाच्या लयीवर नागरिकांनी बेधुंद होऊन गाण्याचा आनंद घेतला. संगीताची ही सुरेल परंपरा आमदार देवयानी फरांदे यांनी गेली अनेक वर्षे अखंडपणे जपली आहे. प्रत्येक वर्षी दिवाळीच्या या मंगल प्रसंगी नाशिककरांसाठी संगीताच्या सुरांनी सजलेली पहाट रंगवण्याचा उपक्रम त्यांनी कायम ठेवला आहे.

■ भाऊबीज पहाटेत पद्मश्री सुरेश वाडकर यांचा सुरेल जलवा

# प्रकाश उघडे यांचा राज्यस्तरीय माहिती अधिकार उत्कृष्ट कार्य गौरव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

लोकशाहीतील पारदर्शकतेचा आणि जनतेच्या हक्कांचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करणारा "माहितीचा अधिकार कायदा" प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ज्ञानमाता माहिती अधिकार संस्था, पुणे यांच्या वतीने श्री प्रकाश उघडे यांना "राज्यस्तरीय माहिती अधिकार उत्कृष्ट कार्य पुरस्कार – २०२५" प्रदान करण्यात आला.

या गौरवाच्या निमित्ताने दिवाळीच्या मंगलप्रसंगी, २४ ऑक्टोबर २०२५ रोजी विठे गावात ग्रामस्थ, मित्रपरिवार व सामाजिक बांधवांच्या उपस्थितीत श्री प्रकाश



उघडे यांचा सत्कार करण्यात आला. या सन्मान सोहळ्याने संपूर्ण गावात अभिमान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिक, शिक्षकवर्ग, सामाजिक कार्यकर्ते तसेच तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वांनी श्री उघडे यांच्या जनहितासाठी केलेल्या कार्याची प्रशंसा करत, माहिती अधिकार कायद्याच्या जनजागृतीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रकाश उघडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की — "हा पुरस्कार माझा वैयक्तिक सन्मान नसून, गाव, समाज आणि सर्व जनजागृत नागरिकांचा सन्मान आहे. ग्रामस्थांनी केलेला आजचा सत्कार माझ्या मनात नवी ऊर्जा आणि जबाबदारी निर्माण करणारा आहे.

माहिती अधिकार हा कोणाच्याही विरोधासाठी नसून, लोकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आणि प्रशासन पारदर्शक ठेवण्यासाठी आहे."

या कार्यक्रमाला विशेष मान्यवर उपस्थित होते —

ACP आवारी साहेब (मुंबई), मा. विलास बागड (RFO नागपूर), मा. जनार्दन वाकचौरे (PWD अधिकारी ठाणे), मा. भरत आवारी, मा. आयुक्त नाशिक, मा. विलास आवारी सर, मा. अशोक शेठ आवारी (अध्यक्ष, मारुती देव ट्रस्ट), मा. जीवन शेठ वाकचौरे (सचिव, मारुती देव ट्रस्ट), मा. मोहन वाकचौरे (विश्वस्त, मारुती देव ट्रस्ट), मा. दत्तात्रय नामदेव वाकचौरे (चेअरमन, सोसायटी), मा. डॉ. बाळासाहेब चव्हाण, मा. नाना भिमाजी वाकचौरे (चेअरमन, सोसायटी विठे), मा. अशोक आवारी (सामाजिक कार्यकर्ते), मा. सोमनाथ आरज, मा. सौरभ वाकचौरे (तलाठी) आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे शब्दांकन व आयोजन श्री शिवनाथ विठ्ठल आरज, संचालक कृषी बाजार समिती, अकोले व चेअरमन, सोसायटी विठे यांनी केले.

या यशाबद्दल श्री प्रकाश उघडे यांना हार्दिक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा!

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# तांदलवाडी गावात दिवाळी पाडवा कार्यक्रम संपन्न

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील तांदलवाडी या गावात महाएकता फाउंडेशन आणि आदिवासी कोळी महासंघ रावेर तालुका व महाएकता फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश्वर कोळी आणि ग्रामपंचायत सदस्या साधना योगेश्वर कोळी यांच्या संयुक्त विद्यमाने दीपावली पाडवा साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुरेखा सिद्धार्थ तायडे ह्या होत्या तर रावेर लोकसभा प्रमुख नंदकिशोर महाजन ,नियोजन समितीचे अध्यक्ष छोटुभाऊ पाटील , माजी. जि.प.सदस्य आत्माराम कोळी , बाजार समिती माजी सभापती श्रीकांत महाजन , कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष हरीलाल कोळी , शिवसेना संघटक पंकज कोळी चांगदेव , निवृत्त ग्रामविस्तार अधिकारी संतोष आप्पा सपकाळे , तलाठी स्मिता कोळी , उपसरपंच आशाताई पाटील , माजी उपसरपंच कलावती कोळी , आदिवासी कोळी महासंघ जिल्हा महासचिव मनोहर कोळी , ग्रामपंचायत सदस्य शशांक पाटील , नारायण पाटील, प्रमोद उन्हाळे , अरूण पाटील , डॉ. विजय पाटील , डॉ.सारंग पाटील , डॉ .एल. जी.पाटील . डॉ.सुमित पाटील , आरोग्य सेवक सुरेश तायडे , सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तायडे , सागर खवले , सत्तार भाई , मनोज चौधरी , साई कोळी , यासह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दत्तात्रय तायडे गुरुजी यांनी केले तर आभार महाएकता फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश्वर कोळी यांनी मानले.





मुंबई : पुनरुत्पादक शेती क्षेत्रातील अग्रणी कंपनी टू ब्रदर्स ऑरगॅनिक फार्म्सने सिरीज बी फंडिंगमध्ये 110 कोटींची गुंतवणूक यशस्वीपणे उभारली आहे. या फंडिंगमध्ये 360 वन ॲसेट, रेनमॅटर इन्व्हेस्टमेंट्स, नरोत्तम सेखसरिया फॅमिली ऑफिस आणि इग्नाइट ग्रोथ एलएलपीचे राहुल गर्ग (माजी प्रेमजी इन्व्हेस्ट सिनियर पार्टनर) यांसारख्या प्रमुख गुंतवणूकदारांचा सहभाग आहे.

## थोडक्यात बातम्या...




### श्रीरामपूर बस स्थानकाचा स्लॅब कोसळून महिला गंभीर जखमी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील बसस्थानकात पुणतांबाकडे जाणाऱ्या बसची वाट पाहत असतांना एका महिलेच्या डोक्यावर बस स्थानकाचा स्लॅबचा काही भाग कोसळून महिला गंभीर जखमी होऊन रक्तस्राव झाल्यामुळे बेशुद्ध पडली. त्यांना तात्काळ कामगार हॉस्पिटल येथे नेऊन दाखल करण्यात आले. दरम्यान महानुभव पंथ भक्त असलेल्या या महिलेचे नाव प्रांजलगुरु लक्ष्मीबाई पंजाबी असे असल्याची माहिती समजते. कामगार हॉस्पिटल येथे डॉक्टर शेख यांच्या देखरेखी खाली व डीन श्री.डॉ.जगधने यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत.तसेच या जखमी महिलेची सुभाष त्रिभुवन, बाबा शिंदे, तेजस गायकवाड ,शिवाजी दांडगे,अमोल मिसाळ यांनी रुग्णालयात जाऊन भेट घेत विचारपूस केली.

### निवडणुका डोळ्यासमोर ठेवून दिली मेजवानी; पक्षश्रेष्ठींचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यातील कासराळी येथील भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी मागील काळात आपल्या जि.प गटासह आतापर्यंत तीन गटावर आलटूनपालटून सत्ता मिळवली पण त्या तीन गटात मात्र अद्यापही विकास करता आला नाही. यामुळे त्यांच्यावर तालुक्यातील जनतेकडून नाराजीचे सूर निघत आहे. परंतु ठक्करवाड यांनी चौथ्यांदा " मी पुन्हा येईन चा" नारा देत ऐन दिवाळी सना निमित्त मतदारांना आपल्या निवास्थानी गोड जेवणाची मेजवानी देवून आपल्या पक्षश्रेष्ठींना जमाव दाखवून पक्ष श्रेठीचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी मागील काळात तालुक्यातील लोहगांव, सगरोळी, आरळी या जिल्हा परिषदच्या गटावर आलटूनपालटून सत्ता मिळवून गेली दीड दशक सत्तेचा उपभोग घेतला परंतु आतापर्यंत या तिन्ही गटाचा विकास मात्र शून्यचं..? असतांना आता सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव असलेल्या लोहगांव जि. प. गटावर डोळा ठेवून आपली दावेदारी कायम ठेवली आहे. माजी आमदार कै. गंगाराम ठक्करवाड यांची तालुक्यातील सामान्य जनतेशी चांगली नाळ जोडलेली असल्यामुळे त्याकाळात त्यांना जनतेचा जनाधार म्हणून ओळख झाली होती. त्यामुळे त्यांचे सुपुत्र लक्ष्मण ठक्करवाड यांना जिल्हा परिषद लोहगांव, सगरोळी, आरळी या गटातून तिन वेळा निवडून दिले.परंतु या तिन्ही गटावर दीड दशक सत्तेवर राहून त्या भागाचा अद्यापही विकास करता आला नसल्याने आजही या भागाची दुरावस्था आहे. सद्यस्थीत ठक्करवाड हे निवडणुकीच्या काळात प्रचाराला येणे पुन्हा पाच वर्ष त्या भागात पाऊल न ठेवणे अशी त्यांची छभी निर्माण झाली असल्याचे बोलल्या जात आहे. असे असलेतरी आगामी होऊ घातलेल्या जि.प. निवडणुकीत लोहगांव गट हा सर्वसाधारणसाठी सुटला आहे. यात त्यांचे विश्वासू किंवा भाजपाच्या निष्ठावंतांना संधी मिळेल अशी अपेक्षा असतांना ठक्करवाड हे पुन्हा येईनचा नारा देत चौथ्यांदा आपलीच दावेदारी समजून ऐन दिवाळी सना निमित्त निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन( दि.२२) ऑक्टोबर रोजी भाजपासह विविध पक्षाचे नेते व तालुक्यातील कार्यकर्त्यांना दिवाळीच्या गोड जेवणाच्या मेजवानीस आमंत्रित केले. यानिमित्त आलेल्या कार्यकर्त्यांचा जमाव आपल्या पक्षश्रेष्ठींना दाखवून आपली श्रेष्ठता दाखून दिली. अशी माहिती कार्यक्रमास आलेल्या कार्यकर्त्यांनी नावं न सांगण्याच्या अटी वरून दिली आहे.

### एक मंतरलेली दिवाळी पहाट; रसिक मंत्रमुग्ध



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ओतूरकर आणि परिसरातील रसिक ज्या क्षणांची वाट पाहत होते ती अविस्मरणीय दिवाळी पहाट स्वर गंगेच्या काठी पर्व ३ रे बुधवार दि:-२२ ऑक्टो- २०२५ रोजी पहाटे ठीक ५.३० वाजता सुरू होऊन मोठ्या दिमाखात,दैदित्यमान स्वरूपात आणि उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध करीत संपन्न झाली. सांस्कृतिक विविधतेने नटलेली शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यातील ओतूर नगरीमध्ये गुरु चैतन्य महा राजांच्या वैष्णव पंथाचा "राम कृष्ण हरी" हा मंत्र संत श्रेष्ठ जगतगुरु वंदनीय संत तुकाराम महाराज यांनी दिला त्या पावन भूमीत श्री कपार्दिकेश्वर देव धर्म संस्था ओतूर,शिवनेरीचे शिलेदार समूह आणि ग्रीनव्हीजन फाउंडेशन ओतूर यांच्या संयुक्त विद्यमानाने, दानशूर व्यक्तिमत्व रमेश डुंबरे पाटील,प्रा.शुभांगी रमेश डुंबरे पाटील व संयोजक अनिल तांबे,पोपटराव नलावडे आणि महेंद्र गांधी पानसरे यांच्या सौजन्यातून आणि संकल्पनेतून ओतूरच्या विस्तीर्ण प्रांगणात हा तृतीय ऐतिहासिक दिवाळी पहाट संगीतमय कार्यक्रम साजरा झाला. कार्यक्रम अलोट गर्दीत सारेगम लिटिल चॅम्प विजेते काळजाला हात घालणारे मंत्रमुग करणारे भक्त संगीत,आपल्या सृजनशील आवाजाने रसिक मनावर राज्य करणारे,कलात्मक तेची मोहोर उमटविणारे, आपल्या आवाजाच्या भावस्पर्शी लहरींनी असंख ह्रदयाचे ठाव घेणारे प्रथमेश लघाटे व मुग्धा वंशंमपायन या गाजलेल्या, लोकप्रिय कलाकार यांच्या मंत्रमुग्ध करणारे गायन कलेतून सादर करत,प्रेक्षक वर्गाचीदाद मिळविली.

# सर्वसामान्यांना कधी ही वाऱ्यावर सोडणार नाही, प्रसंगी राजकारण सोडू : सचिन वराळ पाटील

**निघोज : (समर्थ गांवकरी)**



संदीप पाटील वराळ यांनी गेल्या ११ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या गरीबांची दिवाळी हा उपक्रम सातत्याने सुरूच ठेऊ, या उपक्रमातून सर्वसामान्य लोकांची दिपावली गोड होते, यांना आम्ही कधी ही वाऱ्यावर सोडणार नाही, वेळ प्रसंगी आम्ही राजक सोडू, पण हा उपक्रम बंद होऊ देणार नाही, अशी ग्वाही संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊन्डेशन चे अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी दिली.

"गरीबांची दिवाळी" हा उपक्रम पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती व निघोजचे माजी सरपंच दिवंगत संदीप वराळ पाटील यांनी खिश्यात पैसा नसतानाही लोकसहभागातून गेल्या ११ वर्षांपूर्वी सुरू केला. त्यानिमित्त परवा बुधवारी निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या गरीब महिलांना एक साडी व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष सचिन वराळ पाटील पुढे म्हणाले की, या उपक्रमात कन्हैय्या परिवाराचे अध्यक्ष दिवंगत शांताराम मामा लंके यांचा सिंहाचा वाटा आहे. या उपक्रमातंगर्त आमची सर्व सामान्यांशी नाळ जोडली गेली आहे. भविष्यात ही आमचे वराळ कुटुंबीय या सर्व सामान्य लोकांबरोबर राहणार आहेत. यांना कोणालाही कसलीही अडचण आल्यास जनसेवा फाऊन्डेशन च्या कार्यालयात संपर्क साधावा. या उपक्रमाला कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण येऊ नये, म्हणून अशी अनेक कुटूंबे आहेत की, जी निघोज मध्ये राहत नाही, पण भरीव आर्थिक मदत करतात, तर काही गुप्त मदत ही करतात. माझ्या वराळ भावकीची ही मोठी मदत असते. गावाच्या विकासात आमच्या कुटुंबाचे मोठे योगदान आहे. पत्रकार बांधव ही आपापल्या लेखनी च्या माध्यमातून प्रामाणिक मदत करतात व सर्वदूर प्रसिद्धी देण्याचे काम करतात, असे गौरवोद्गार ही सचिन वराळ पाटील यांनी काढले आहे. या उपक्रमाचे प्रास्ताविक मुंबई बँकेचे वरिष्ठ अधिकारी सुनिल पवार करताना म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून गरीबांची दिवाळी हा उपक्रम संदीप पाटील वराळ राबवत असे, तदनंतर सचिन पाटील वराळ हे राबवत आहे. भावाने हा सुरू केलेला उपक्रम त्यांच्या नंतर भाऊ सचिन पाटील वराळ यांनी अखंड पणे सुरूच ठेवला. जोपर्यंत सुर्य, चंद्र, तारे आहेत, तो पर्यंत वराळ परिवार राहणार आहे, असे गौरवोदगार ही त्यांनी काढले.

तर पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे यांनी हा गरीबांची दिवाळी उपक्रम सुरू करण्यापासून ते आता पर्यंतचा ११ वर्षांचा इतिहास मांडला व वराळ परिवारा बद्दल गौरवोद्गार काढले. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी व निवड झालेल्या रुक्साना हवालदार, यांची पोलीस दलात निवड, कराटे प्रशिक्षक ओंकार रणसिंग, कराटे खेळाडू सई राऊत, विहा लामखडे, मेथली गायकवाड, परवेझ तांबोळी, आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू आर्यन ढवळे, सागर जगताप व पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, युवक काँग्रेसचे पारनेर तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, राळेगण थेरपाळ चे सरपंच पंकज कारखिले, तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुकुंदराव निघोजकर, यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाचे महत्व विशद केले.

## देहात ग्रेट गहू महोत्सवाचा दुसरा सिझन लॉंच!

**गुरुग्राम/बिहार: (समर्थ गांवकरी)**




देशातील सर्वात मोठी कृषी तंत्रज्ञान कंपनी देहातने ग्रेट गहू महोत्सवाचा दुसरा हंगाम सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत, देहातच्या संशोधन गव्हाच्या बियाण्या खरेदी केल्यावर एकूण २००१ विजेत्या शेतकऱ्यांना बोलेरो, ट्रॅक्टर आणि बुलेटसह आकर्षक भेटवस्तू मिळतील. गेल्या रब्बी हंगामात देशभरातील १.५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला होता. त्यापैकी २,००१ विजेत्या शेतकऱ्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली. योजनेचा सर्वोच्च पुरस्कार भोपाळच्या जितेंद्र मीना (गब्बर) यांना मिळाला, ज्यांनी महिंद्रा भूमीपुत्र ट्रॅक्टर जिंकला. दुसरा सर्वोच्च पुरस्कार, मारुती अल्टो, पटनाचे गोलू कुमार यांनी जिंकला. या प्रसंगी बोलताना, देहातचे सह-संस्थापक आणि सीओओ श्याम सुंदर सिंग म्हणाले, "गेल्या हंगामात शेतकऱ्यांनी देहातवर विश्वास दाखवला आणि योजनेत ज्या पद्धतीने सहभाग घेतला ते प्रशंसनीय आहे.

## वागड रघुवंशी मित्र मंडळातर्फे भव्य स्नेह मिलन सोहळा संपन्न!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



मुंबई, ठाणे, नवी मुंबई, डोंबिवली आणि परिसरात राहणाऱ्या वागड लोहाणा समाजातील कुटुंबांचा वार्षिक नववर्ष स्नेह मिलन मेळावा बुधवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाणे येथील शेठ एन. के. टी. ठाणावाला सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन समाजाचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, मानद मंत्री श्री नटवरलाल वीरजीभाई ठक्कर आणि उपाध्यक्ष श्री दिनेशभाई दीपचंदभाई कोटक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.कार्यक्रमात समाजातील लहान मुलांनी रंगतदार नृत्य आणि गायन सादरीकरणे करून उपस्थितांचे मन जिंकले. त्यांच्या कलात्मक सादरीकरणासाठी विजेत्या मुलांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. स्नेहसंमेलनाच्या नियोजनात श्री परेश नानजीभाई ठक्कर, श्री मुकेशभाई एम. रैया, प्रवीण एस. सचदेव, अजय व्ही. सायता, गोविंदजी एन. ठक्कर, रमेश पुजारा तसेच अनेक तरुण सदस्यांचे मोलाचे योगदान लाभले. या मेळाव्यात वागड लोहाणा समाजातील शेकडो कुटुंबांनी हजेरी लावून कार्यक्रमाचा आनंद लुटला. उपस्थित सदस्यांसाठी स्वादिष्ट जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकमेकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी क्षत्रिय समाजाचे नेते बटूकसिंह वाघेला हे देखील विशेष उपस्थित होते. एकात्मता, आनंद आणि परस्पर स्नेह वाढविणाऱ्या या कार्यक्रमामुळे वागड लोहाणा समाजात नवचैतन्य निर्माण झाले.

## गाई व म्हशी क्रुरूरतेणे वाहतूक करणाऱ्या विरूद्ध गुन्हा दाखल

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



क्रुररतेन कोंबून वाहतुक करीत असलेले तिन आयचर वाहन पकडुन एकुन ३६, २५, ००० /- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असुन या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत अवैध व्यवसाय व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहेत त्या अनुषंगाने ओमकांत चिचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे आदेशान्वये दिनांक २१ आक्टोंबर रोजी अधिकारी व अंमलदार असे खाजगी वाहनाने पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना दिनांक २१ रोजी च्या ९ वाजून १० मिनटांनी गोपनीय माहिती मिळाली की, टापरे चौक वाजेगाव बायपास रोडवर लिन आयचर मध्ये अवैध गोवंश जातीचे बैल, गायी व मैशी टाकून प्राण्यास इजा पोहचेल अशा रितीने क्रुररतेने वागणूक देवून वाहनात कोंबुन वाहतुक करीत आहे अशी, माहीती मिळाल्याने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड़ पोहेकों शेख इब्राहीम पोहेकॉ केंद्रे, पोकों पवार पोकों, ५०५ गंगलवाड सर्च नेमणुक पो स्टे, नांदेड ग्रामीण टापरे चौक वाजेगाव बायपास रोडवर थांबले असता तिन आयचर वाहणे पांढ्या रंगाचा आयचर कंपनीचे वाहन क्र HR-45D-5431 ,एक लाल रंगाचा आयचर कंपनीचे वाहन क्रHR-45D-0757 , एक लाल रंगाचा आयचर कंपनीचे वाहन क्र HR-45C-7698 मिळून आले.

## मॅटरने २२व्या शतकातील स्मार्ट ओनरशिप प्लॅन्स सादर केले

**(समर्थ गांवकरी)**



भारतामधील अग्रगण्य इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी मॅटरने या दिवाळीत देशभरात आपल्या "22व्या शतकातील स्मार्ट ओनरशिप प्लॅन" सुरू करण्याची घोषणा केली आहे. या योजनेमुळे वाहनाची मालकी आता पूर्वीपेक्षा अधिक स्मार्ट, सोपी आणि परवडणारी बनली आहे. भारताची पहिली लाइफटाइम बॅटरी वॉरंटी असलेली दुचाकी एराने आधीच एक बेंचमार्क स्थापित केला आहे. आता मॅटरने इलेक्ट्रिक वाहन मालकीच्या पद्धतीत बदल घडवून आणला आहे. वाहन खरेदीचा खर्च आणि बॅटरी वापराचा खर्च वेगळा करून, तसेच विविध आर्थिक योजनांद्वारे सोपे पेमेंटचे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत.

# पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील संथ कामामुळे जनतेचे हाल

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



### डॉ. विश्वासराव आरोटे कळसूबाई शिखरावरून

महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि कृषी विकासाला नवी गती देणारा म्हणून ओळखला जाणारा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग आज जनतेच्या संतापाचा विषय ठरत आहे. या महामार्गावरील काम गेल्या अनेक महिन्यांपासून अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. परिणामी, दररोज हजारो प्रवाशांना वाहतुकीच्या अडचणींना, अपघातांच्या धोक्यांना आणि प्रचंड वेळेच्या अपव्ययाला सामोरे जावे लागत आहे. महामार्गावरील अनेक ठिकाणी खोदकाम सुरू असून, काही भागांत काम थांबलेले आहे. रस्त्याची रुंदीकरण प्रक्रिया अधांतरी असल्याने वाहनचालकांना कोंडी, धूळ आणि असमान रस्त्यांचा सामना करावा लागत आहे. विशेषत: इंदापूर, सिन्नर, संगमनेर आणि अकोले या परिसरातील लोकांना दररोज प्रवास करताना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागतो. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार सत्यजीत तांबे यांनी या विषयावर केंद्र आणि राज्य शासनाच्या पातळीवर ठोस पावले उचलली आहेत. आमदार सत्यजीत तांबे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा : १० जुलै २०२५ रोजीच्या पावसाळी अधिवेशनात आमदार तांबे यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. महामार्गाचे काम अत्यंत संथगतीने चालू असल्याची खंत व्यक्त करत, त्यांनी तातडीने काम पूर्ण करण्याची ठाम मागणी सरकारकडे केली. २५ जुलै २०२५ रोजी ते दिल्ली येथे गेले आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. नितीन गडकरी यांची भेट घेतली. त्यांनी प्रत्यक्ष गडकरी साहेबांना जनतेचा आक्रोश, अपघातांचे वाढते प्रमाण आणि अपूर्ण कामामुळे होणाऱ्या हालांची सविस्तर माहिती दिली. ३० सप्टेंबर २०२५ रोजी आमदार तांबे यांनी पुन्हा पत्राद्वारे गडकरी साहेबांना महामार्गाच्या कामाकडे वैयक्तिक लक्ष घालण्याची विनंती केली. पत्रात त्यांनी नमूद केले की, हा रस्ता केवळ प्रवासाचा मार्ग नसून, राज्यातील व्यापारी, शेतकरी आणि उद्योग क्षेत्राचा कणा आहे. त्यामुळे या कामाला प्राधान्याने गती देणे अत्यावश्यक आहे.

आमदार सत्यजीत तांबे यांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे की, जोपर्यंत पुणे-नाशिक महामार्गाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत या मार्गावरील तीनही टोल नाके तातडीने बंद करण्यात यावेत. त्यांचे म्हणणे आहे की, "अपूर्ण काम, असुविधाजनक रस्ते आणि असुरक्षित प्रवास अशा परिस्थितीत सरकारकडून टोल वसूल करणे हे अन्यायकारक आहे. जनतेकडून पैसे घेत असताना त्यांना सुविधा आणि सुरक्षितता मिळाली पाहिजे." आमदार सत्यजीत तांबे यांनी केवळ विधानसभेत आवाज उठवला नाही, तर प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन आणि पत्रव्यवहार करून या प्रश्नाला प्राधान्य दिले आहे. त्यांनी दाखवलेले हे नेतृत्व लोकहिताचे, जबाबदार आणि संवेदनशील राजकारणाचे उत्तम उदाहरण ठरते. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पुणे-नाशिक महामार्गाच्या कामाबाबत शासनाच्या संबंधित विभागांवर दबाव निर्माण झाला असून, लवकरच या कामाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या महामार्गावरील प्रवाशांनी आणि स्थानिक रहिवाशांनी आमदार तांबे यांच्या पुढाकाराचे स्वागत केले असून, "आमच्या अडचणींसाठी प्रत्यक्ष आवाज उठवणारे प्रतिनिधी मिळाले हे आमचे भाग्य आहे," असे म्हणत त्यांनी त्यांच्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य आणि केंद्र सरकारने लवकरात लवकर कामाचा आढावा घेऊन पुणे-नाशिक महामार्गाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, हीच जनतेची आणि आमदार सत्यजीत तांबे यांची ठाम मागणी आहे.

# राज्यस्तरीय आदर्श मॉडेल पुरस्काराने सागर त्रिभुवन सन्मानित



छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)

कोपरगाव तालुक्याचा अभिमान असलेल्या सागर रामभाऊ त्रिभुवन या युवा मॉडेलला पहाट फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित "गौरव महाराष्ट्राचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा 2025" मध्ये राज्यस्तरीय आदर्श मॉडेल पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला. मॉडेलिंग क्षेत्रात उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सागर त्रिभुवन यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, याच वर्षात सागर यांना मिळालेला हा तिसरा राज्यस्तरीय सन्मान आहे. यापूर्वी त्यांना बाबासाहेब बागमार ग्रँड आयकॉन अवॉर्ड 2025 आणि आंतरराष्ट्रीय फॅशन शो सम्राट समाजरत्न पुरस्कार या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले होते.

तसेच, अहिल्यानगर येथे मॉडेलिंग व कला क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना वीर शिवछत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सागर त्रिभुवन यांच्या यशाबद्दल कोपरगाव व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

हा पुरस्कार सोहळा पहाट फाउंडेशनचे संचालक माननीय अमोल शामराव भिलंगे, संचालिका अर्पिता पुंजाजी सुरडकर, शिव व्याख्याते सचिन देवरे सर (पाचोरा) आणि संचालक सोमनाथ श्रावण चौधरी (पार्ट फाउंडेशन) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

सागर त्रिभुवन यांच्या या यशामुळे कोपरगावचा गौरव आणखी उंचावला असून, त्यांनी तरुणाईसमोर प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.



ठाणे : दिव्यातील बेतवडे प्रतिष्ठान आयोजित स्वरमैफल दिपसंध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यंदा प्रतिष्ठानचे ५ वे वर्ष असून सुंदर व मंत्रमुग्ध करणारा गायन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाला बेतवडे गावातील समस्त ग्रामस्थ, जय हनुमान भजन मंडळ, गावदेवी माऊली भजन मंडळ त्याचबरोबर दिवा शहरातील सामाजिक क्षेत्रातील संघटना तसेच इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### डिंगोरे दिपावलीत भाऊबीजेचा अनोखा उपक्रम

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : सालाबादप्रमाणे डिंगोरे गावातील श्रीराम मंदिरात माहे अश्विन-कार्तिक या महिन्यात काकडा महाआरतीचे अध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज शेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली खास भाऊबीजेचा अनोखा उपक्रम साजरा करण्यात आला. गावा तील ५० पुरुष व ५० महिला यांच्या भावा-बहिणींच्या नात्याला दृढ करण्यासाठी एकमेकांना ब्लाऊज पीस,रुमाल व करगोटा देऊन दीपावलीतील अत्यंत पवित्र भाऊबीज कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य सीमा शंकर भिसे गुरुजी यांच्या सौजन्याने देण्यात आले. कार्यक्रमास ह.भ.प.मुरली महाराज उकिरडे,ह.भ.प.शंकर महाराज लोहोटे,दत्तात्रयमहाराज उकिरडे,प्रल्हाद महाराज नायकोडी,मधुकर महाराज, एल.टी.लोहोटे महाराज,कमल सुकाळे,मंदा शिंदे,शैला सुकाळे, मंदा उकिरडे,मीरा सुकाळे,सुमन लोहोटे याशिवाय गावातील बहुसंख्य जेष्ठ महिला आणि पुरुष उपस्थित राहून आपल्या परीने योगदान देत असतात. यावेळी उपस्थित सर्वांचे आभार ह.भ. प.संदीप शिंगोटे यांनी मानले.

### वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करत समाजसेवकाचा आगळावेगळा संदेश



ठाणे, दिवा (स. गांवकरी) : वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करत दिव्यातील समाजसेवक व ॲड. बिपीन दुबे यांनी आगळावेगळा संदेश दिला आहे. राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघ महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. बिपिन कुमार दुबे यांनी त्यांच्या टीमसह दिवा शहरातील वृद्धाश्रमाला भेट दिली आणि वृद्धांना स्वतः मिठाई आणि इतर खाद्यपदार्थ खाऊ घातले आणि त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. दुबे यांच्या सेवेच्या भावनेने प्रेरित होऊन आश्रमातील ज्येष्ठांनी त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला आणि त्यांना जीवनात गरीब आणि वृद्धांची सेवा करत उदात्त आणि पुण्यपूर्ण कृत्ये करत राहण्यास प्रोत्साहित केले. दिव्यातील साबे गावातील अपना घर या वृद्धाशमाला भेट देऊन राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघांचे बिपिन कुमार दुबे, आकाश तिवारी, विनय दुबे आणि विनीत सिंग यांनी वृद्धाश्रमात मिठाई आणि इतर अन्नपदार्थ भेट म्हणून दिले. विपिन दुबे यांनी यावेळी बोलताना सांगितले की मानवतेची सेवा करणे म्हणजे देवाची सेवा करणे. ही सेवा केल्याने एक अनोखी आनंदाची भावना येते. प्रत्येक पालकाला असे वाटते की त्यांचे मूल भविष्यात त्यांचा आधार बनावे. जे स्वतःच्या पालकांची काळजी घेऊ शकत नाहीत ते त्यांना वृद्धाश्रमात सोडून देतात. अशा परिस्थितीत आपण सर्वांनी पुढाकार घेऊन पुढे येण्याची गरज आहे. जर आपण समाजासाठी काही करू शकलो तर ते आपल्यासाठी हे भाग्य समजावे असे दुबे यांनी बोलताना स्पष्ट केले.

### डॉ. बबनराव टिळेकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

पाथर्डी (स. गांवकरी) : साईनगरी शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे बी दि चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ सोहळ्याचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात राज्यातील अनेक गुणी व कार्यक्षम शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला. शिक्षक हेच समाजाची आदर्श पिढी घडवणारे शिल्पकार असून, त्यांच्याच कार्याचा सन्मान करण्याच्या हेतूने फाउंडेशन तर्फे दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. यावर्षीचा हा मानाचा सोहळा शिर्डीत पार पडला. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विठ्ठलराव जपे, श्री. स्वरूप कापे, श्री. निखिल वामन व श्री. दीपक चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. मयूर ढोकचौळे व विश्वस्त श्री. अभिषेक तुपे यांनीही आपली उपस्थिती दर्शवली. यावेळी डॉ. श्री बबनराव बाळासाहेब टिळेकर, दादापाटील राजळे महाविद्यालय आदिनाथनगर तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आणि अनेक आदर्श विद्यार्थी घडविल्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतुक होत असून, या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला अधिक प्रेरणादायी अधिष्ठान मिळाले आहे. या पुरस्काराबद्दल दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आप्पासाहेब राजळे तसेच लोकप्रीय आमदार मोनिकाताई राजळे, जि. प. सदस्य राहुल राजळे, दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव, श्री आर. जे. महाजन, प्राचार्य डॉ. श्री .राजधर टेमकर, प्र. प्राचार्य अशोकराव काळे, कार्यालयीन अधीक्षक श्री विक्रमराव राजळे, प्रा. डॉ.जनार्धन नेहूल, प्रा. मेहबूब तांबोळी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच पाथर्डी मधील शिक्षक मित्र प्राचार्य अशोकराव तुपे, प्राचार्य पांडुरंग गोसावी, डॉ. घुले राजकुमार घुले, प्रा. अरुण नेहूल या सर्वांनी भरभरून कौतुक केले.

# महाराष्ट्राचा कापूस थेट मध्यप्रदेशात विक्रीसाठी! यामागचं खरं कारण वाचून थक्क व्हाल

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी यंदाचा कापूस हंगाम अनेक अडचणी घेऊन आला आहे. हवामानातील अनिश्चितता, अतिवृष्टी, आणि लाल्या या रोगाच्या प्रादुर्भावामुळे कापसाचं उत्पादन घटलं आहे. त्यातच सरकारी खरेदी केंद्रे बंद असल्याने आता शेतकऱ्यांनी एक वेगळाच मार्ग निवडला आहे. त्यांनी आपला कापूस थेट मध्यप्रदेशातील खेतिया बाजारात विकायला सुरुवात केली आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अनेक भागांत या वर्षी पावसाने शेतकऱ्यांची परीक्षा घेतली. कधी पाऊस थांबत नव्हता, तर कधी लांब खंड पडत होता. या अनिश्चिततेमुळे कापसाचं वाढ आणि फुलोरा दोन्ही बाधित झाले. त्यातच काही भागात अतीवृष्टी झाली, त्यामुळे उभं पिकं पाण्यात बुडालं आणि सडून गेलं.जिथं पावसाने नुकसान केलं नाही, तिथं लाल्या या कापसावरील रोगाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली. या रोगामुळे पानं पिवळी पडतात, झाडं कोमेजतात आणि उत्पादनात मोठी घट येते. त्यामुळे या वर्षी शेतकऱ्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी उत्पादन झालं आहे.

केंद्र सरकारकडून कापूस खरेदीसाठी सीसीआयची केंद्रे प्रत्येक जिल्ह्यात उघडली जातात. मात्र, नंदुरबार जिल्ह्यातील दोन मुख्य केंद्रे शहादा आणि नंदुरबार सध्या बंद आहेत. ही केंद्रे आता दिवाळीनंतरच सुरू होणार असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांकडे तयार झालेला कापूस गोदामात साठवून ठेवण्याची सोय नाही. त्यामुळे ते मध्यप्रदेशातील खेतिया बाजारात कापूस विकण्यासाठी निघाले आहेत. शहादा मार्गे खेतियाकडे जाणाऱ्या ट्रॅक्टर आणि ट्रकमध्ये कापूस भरलेला दिसत आहे.

शेतकऱ्यांना खेतिया बाजारात चांगला प्रतिसाद मिळतो आहे. तिथं व्यापारी प्रतिक्विंटल कापसाला किमान ₹ ६,२००ते जास्तीत जास्त ₹ ७,६३५ असा दर देत आहेत. शिवाय, सगळ्यात मोठं आकर्षण म्हणजे पैसे लगेच रोख मिळतात. त्यामुळे शेतकरी अधिक प्रमाणात तिकडे विक्रीसाठी जात आहेत.

केंद्र सरकारने जरी कापसाचा हमीभाव ₹ ७,७१० प्रति क्विंटल जाहीर केला असला, तरी सीसीआय केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना तातडीने पैसे हवे असल्याने ते खासगी व्यापाऱ्यांकडे वळत आहेत.

शेतकरी सांगतात की, "पिकाचं नुकसान झालंय आणि खर्च वाढलाय. खतं, कीटकनाशके, मजुरी सगळं महाग झालं आहे. अशा वेळी सीसीआयचं केंद्र बंद असल्याने वाट पाहणं शक्य नाही. आम्हाला रोख पैसे हवेत, म्हणून आम्ही खेतिया बाजारात जातो."खेतियातील व्यापारी लगेच व्यवहार पूर्ण करतात आणि पैसे देतात, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागवणं सोपं होतं.

### 'नोव्हेंबरअखेर सुरू होणार खरेदी केंद्रे'

सीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे की, नंदुरबार आणि शहादा येथील केंद्रे नोव्हेंबरअखेर सुरू होतील. तेव्हा शेतकऱ्यांना सरकारच्या दराने विक्री करण्याची संधी मिळेल. पण तोपर्यंत बहुतेक शेतकरी आपला माल खासगी बाजारात विकून मोकळे होतील अशी शक्यता आहे.

# दिवाळी पाडवा मेळाव्याची २५ वर्षाची परंपरा कायम

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील घुमटवाडी येथे सालाबाद प्रमाणे दिवाळी पाडवा मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. या वर्षी या कार्यक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली असून रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने नवनाथराव चव्हाण मित्र मंडळा तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.गेल्या २५ वर्षात आज पर्यंत या कार्यक्रमा अंतर्गत नवनाथराव चव्हाण मित्र मंडळा तर्फे १२१८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले आहेत. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला नवनाथराव चव्हाण,सरपंच विजय चव्हाण, युवा मार्गदर्शक विलास राठोड, माजी सरपंच अशोक चव्हाण,उपसरपंच नितीन राठोड, ग्रामरत्न संजय चव्हाण हे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नवनाथराव चव्हाण मित्र मंडळाचे सदस्य प्रविण चव्हाण,अमोल राठोड, बाल्या राठोड ,योगेश राठोड, किशोर राठोड यांनी मेहनत घेतली.

सूत्रसंचालन अतुल राठोड यांनी केले तर आभार विजयकुमार चव्हाण यांनी मानले.

# ओतूरला बळीराजाच्या मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)




सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान, शिवनेरीचे शिलेदार समुह व समस्त ग्रामस्थ ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने बलिप्रतिपदेला आयोजि त करण्यात आलेल्या बळीराजाच्या मिरवणूक,शोभा यात्रेला ओतूरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला अशी माहिती सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर सोन्याबापू डुंबरे यांनी दिली.बळीराजाचे स्मरण करण्या साठी दिवाळीच्या पाडव्याला परिसरातील महिला भगिनी "इडा पिडा टळो,बळीच राज्य येवो "अशी प्रार्थना करतात. शेतकऱ्या ला अस्मानी तसेच सुलतानी संकटांना सामोरे जाऊन सुखा समाधानाने राहता यावे म्हणून ही मिरवणूक काढली जाते. बळीराजा विषयी असलेला शेतकऱ्यांचा लोकभावनेतील सुप्त हुंकार व त्याचे पडसाद ओतूरला उमटले. यावर्षी मिरवणुकीचे हे दुसरे वर्ष होते.अठरा पगड जातीं ना एकत्र ठेवून एकोप्याने राज्य करणारा बळीराजा हा बलदंड राजा होता.त्यामुळे मिरवणुकी मध्ये हिंदू,मुस्लिम, आदिवासी,दलित,इतर मागास वर्गीय,भटके विमुक्त सर्व वर्गा तील नागरीक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.गावगाड्या तील कारु,नारु संस्कृती त्यांच्या तील सामाजिक सलोख्याचे या मिरणूकीतून दर्शन झाले.

मिरवणूकीत वेगवेगळ्या पारंपारिक लोककलांचे सादरीकरण केले गेले.ग्रामीण परंपरा टिकवून ठेवणारे पारंपारिक खेळ,लेझीम पथक टाळ व झांज पथक,दिंडी, आदिवासींचे कांबड नृत्य,लाठी काठी,तलवार बाजी,नंदीबैलवाले वाघे मुरळी मंडळी,वासुदेव, पिंगळा,गोंधळी,शाहीर,पारंपारिक भारुड मंडळे,डोक्यावर तुलसी वृंदावन घेतलेल्या महिला,आणि महिलांचे टाळ पथक,लेझीम पथक यांनी लक्षवेधक डोळ्यांची पारणे फेडणारे सादरीकरण केले.

# आढळगाव पंचायत समिती गणात भाजपचे पारडे जड

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

आढळगाव पंचायत समिती गण अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव झाला असून या गणात भाजपा चे पारडे जड दिसत आहे. आढळगाव पंचायत समिती गण अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव झाल्यामुळे अनेकांनी या गटावर लक्ष केंदीत केले असून या गणात राधा ठवाल या इच्छुक्क असून भाजप महायुती कडून आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे समर्थक अमर छत्तीसे यांच्या पत्नी संध्या अमर छत्तीसे व माजी पंचायत सदस्य रामदास घोडके यांच्या पत्नी सविता रामदास घोडके या इच्छुक असून या गटात आमदार विक्रमसिंह पाचपुते जो निर्णय घेतील तो निर्णय अंतिम असणार आहे,तरी या गणात भाजपा चे पारडे जड असणार आहे.

आमचे नेते माजी मंत्री बबनराव पाचपुते व आमदार विक्रम पाचपुते पंचायत समिती गणाबाबत जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असणार आहे. आम्ही फक्त व्यावसायिक कार्यकर्ते नसून हाडाचे कार्यकर्ते आहोत.

### 'मामा भाचे यांचा निर्णय अंतिम व निर्णायक'!

माजी पंचायत समिती सदस्य रामदास घोडके व आढळगावं चे अमर छत्तीसे हे नातेवाईक असून मामा भाचे आहेत त्यामुळे भाजपा कडे अंतिम निर्णय मामा भाचे घेतील त्यावर पक्ष व वरिष्ट नेते निर्णय घेतील.

उमेदवारी माझ्या पत्नीला किंवा माझा भाचा अमर छत्तीसे याच्या पत्नीला मिळो काही अडचण नाही पण काही अर्धवट समाजमाध्यमातून चुकीच्या बातम्या पसरवत आहेत पण आमचे नेते माजी मंत्री बबनराव पाचपुते व आमदार विक्रमसिंह पाचपुते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असणार आहे. अशी प्रतिकिया रामदास घोडके यांनी दिली.

# जि. प. आर्वीकेंद्र शाळेचा अभिनव उपक्रम

खोडद : (समर्थ गांवकरी)

जि.प. शाळा आर्वीकेंद्र शाळेतील विद्यार्थ्यांनी भेटकार्ड बनविणे या उपक्रमानिमित्ताने भारतीय जवानांना दिवाळीच्या शुभेच्छा संदेश देणारे भेटकार्ड बनविले. भारतीय जवानांना ते पाठविण्यात आले.दिवाळीत आपण आपल्या कुटुंबाबरोबर सण आनंदाने साजरा करतो. पण त्यावेळी भारतीय जवान देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत असतात.आपण सर्व भारतीय नागरिक भारतीय जवानांच्या सोबत आहोत. ही भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण करणे.भारतीय जवानांचे मनोबल वाढवणे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मनात भारतीय जवानांविषयी आणि देशाविषयी सद्भावना देशप्रेम जागृत करणे .या दृष्टीने भारतीय जवानांसाठी भेटकार्ड बनवणे हा अभिनव उपक्रम शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात आर्वीकेंद्र शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या सभासदांना दिवाळी भेट म्हणून सुरभि आरोग्य कार्डचे वाटप

## पंडित दीनदयाळ यांनी सांगितल्याप्रमाणे शेवटच्या घटकांपर्यंत विकास झाला तरच देशाची प्रगती होईल-वसंत लोढा

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



पंडित दीनदयाळ पतसंस्था व सुरभि हॉस्पिटलमध्ये सभासदांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एक करार झाला आहे.

सध्याच्या काळात न परवडणारा दवाखान्याचा व औषध उपचाराचा खर्च याचा विचार करता पतसंस्थेने सभासदांच्या हितासाठी दिवाळी भेट म्हणून पंडित दीनदयाळ- सुरभि आरोग्यकार्ड देण्याचे ठरविले आहे.या आरोग्य कार्ड मार्फत सभासदांना सवलतीच्या दरात उपचार मिळणार आहेत.तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना,आयुष्यमान भारत योजना, विविध कॅशलेस सुविधा या योजनेचा देखील लाभ देणार आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी सांगितलेल्या "एकात्म मानवतावाद" सिद्धांतानुसार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास झाला तरच देशाची प्रगती होईल.हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सभासदांना पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने सुरभि आरोग्य कार्ड देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेचा लाभ ५ वर्ष मिळणार आहे.या योजनेचा जास्तीत जास्त सभासदांनी लाभ घ्यावा. असे आवाहन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ पतसंस्था व सुरभि हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पतसंस्थेच्या सभासदांना पंडित दीनदयाळ- सुरभि आरोग्य कार्डचे वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा,मानद सचिव विकास पाथरकर,संचालक शारदाताई होशिंग,रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, सुरभि हॉस्पिटलचे चेअरमन अनिरुध्द देवचक्के, संचालक डॉ.अमित पवार,मधुमेह तज्ज्ञ डॉ.प्रियन जुनागडे, संचालक अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विलास व्यवहारे, संचालक अमित कोठारी,संचालक डॉ.विनायक शिंदे,वैद्यकीय अधीक्षक संचालक डॉ. चंद्रशेखर जंगम, संचालक डॉ.मंदार शेवगांवकर ,पंडित दीनदयाळ प्रतिष्ठानचे सचिव बाळासाहेब भुजबळ,कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,शामराव वागस्कर,मिलिंद कोलते, भाजपचे सचिन पारखी, उज्वला भांगे,ज्ञानेश्वर भांगे,पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे,उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर आदी उपस्थित होते.

अनिरुद्ध देवचक्के म्हणाले, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सुविधा रुग्णांना मिळतातच परंतु त्याही पलीकडे जाऊन एक आपुलकीने विचारपूस करणारी जीवाभावाची यंत्रणा असेल तर रुग्ण लवकर बरा होतो. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून पंडित दीनदयाळ पतसंस्था व सुरभि हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीनिमित्त सभासदांना आरोग्य कार्ड वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पहिल्यांदाच कर्ज घेणाऱ्या ग्राहकांपर्यंत डिजिटल बँकिंग सेवा आणत उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या

# 'हॅलो उज्जीवन' ॲपद्वारे 690 कोटी रु.चे आर्थिक व्यवहार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या मायक्रोबँकिंग ग्राहकांसाठी खास तयार केलेल्या मोबाईल बँकिंग प्लॅटफॉर्म 'हॅलो उज्जीवन' ला सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत 690 कोटी रु.चे आर्थिक व्यवहार पार पडले आहेत. बहुतांशी प्रथमच डिजिटल बँकिंगचा वापर करणाऱ्या समूह आणि वैयक्तिक कर्ज घेणाऱ्या मायक्रोफायनान्स ग्राहकांसाठी तयार केलेले हे ॲप आर्थिक व्यवहारापासून दूर असणे आणि आर्थिक सक्षमीकरण यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरले आहे. 13 लाखांहून अधिक डाउनलोडसह, हॅलो उज्जीवनने आपल्या मायक्रोबँकिंग ग्राहकांमध्ये सखोल सहभाग मिळविला आहे. त्यापैकी 98 टक्के महिला ग्राहक असून सरासरी वापरकर्त्यांचे वय 35 वर्षे आहे. ॲपद्वारे 277 कोटी रु. च्या कर्ज परतफेडी, 358 कोटी रु. च्या ठेवी (फिक्स्ड आणि रिकरिंग डिपॉझिट अकाउंट्स), 34 कोटी रु. चे वैयक्तिक कर्ज वितरण तसेच 2.4 कोटी रु. च्या 36,000 हून अधिक हॉस्पीकेअर विमा खरेदी यांना सहाय्य मिळाले आहे.


याशिवाय, पाच लाखांहून अधिक कर्ज वितरण पावत्यांचे डिजिटल पोहोच पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होत असून त्यामुळे ग्राहकांना बँकेत प्रत्यक्ष भेट देण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. भौतिक व्यवहारांपासून डिजिटल व्यवहारांकडे झालेला हा बदल पारंपरिक बँकिंग तंत्रज्ञानाशी अपरिचित असलेल्या ग्राहकांमध्ये मोठा वर्तनात्मक बदल दर्शवतो.

"भारताचे पहिले व्हॉईस-व्हिज्युअल-व्हर्नॅक्युलर मोबाइल बँकिंग ॲप" म्हणून ओळखले जाणारे हॅलो उज्जीवन हे उपलब्धतेला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आले आहे. या ॲपमध्ये आवाजावर आधारित सहाय्य, दृश्यात्मक दिशादर्शन आणि 11 भारतीय भाषांमधील बहुभाषिक सुविधा (हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, गुजराती, कन्नड, मल्याळम, पंजाबी, आसामी, ओडिया आणि इंग्रजी) उपलब्ध आहे. वाचनक्षमता आणि भाषेच्या अडथळ्यांना दूर करून, हे ॲप ग्राहकांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत आणि पद्धतीत कर्ज मंजूर झाल्याची पावती, परतफेड, बचत आणि विमा यांसारख्या मूलभूत बँकिंग सेवा स्वतंत्रपणे करण्यास सक्षम करते.



मंचर प्रतिनिधी : एक दिवा वंचितांसाठी" या उपक्रमाच्या माध्यमातून भाजप आंबेगाव तालुक्याच्या वतीने मंचर शहरातील शेवराई नगर आदीवासी फासेपारधी समाज पालावरील वस्तीमधील बांधवांसाठी दीपावली शिधा वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, जिल्हा उपाध्यक्ष संजयभाऊ थोरात यांच्या सूचनेनुसार "एक दिवा वंचितांसाठी" या उपक्रमाच्या माध्यमातून भाजप आंबेगाव तालुक्याच्या वतीने मंचर शहरातील शेवराई नगर आदीवासी फासेपारधी समाज पालावरील वस्तीमधील बांधवांसाठी दीपावली शिधा वाटप करण्यात आले.या उपक्रमाद्वारे दिवाळीच्या प्रकाशात प्रत्येक घर उजळावे या हेतूने वंचित बांधवांपर्यंत आनंदाचा एक किरण पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.असे प्रियांका संजय थोरात,भाजप तालुकाध्यक्ष स्नेहल चासकर यांनी सांगितले.शिधा वाटप प्रसंगी भाजपचे तालुका उपाध्यक्ष कालिदास गांजाळे, सुनीत थोरात,सुदर्शन चपटे इतर मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### दिवाळी पाडवा मेळावा; दिवाळी पाडवा मेळाव्याची २५ वर्षांची परंपरा कायम

पाथर्डी (स. गांवकरी) : तालुक्यातील घुमटवाडी येथे सालाबाद प्रमाणे दिवाळी पाडवा मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. यावर्षी या कार्यक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली असून रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने नवनाथराव चव्हाण मित्र मंडळा तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गेल्या २५ वर्षात आज पर्यंत या कार्यक्रमा अंतर्गत नवनाथराव चव्हाण मित्र मंडळा तर्फे १२१८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले आहेत. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नवनाथराव चव्हाण,सरपंच विजय चव्हाण, युवा मार्गदर्शक विलास राठोड, माजी सरपंच अशोक चव्हाण,उपसरपंच नितीन राठोड, ग्रामरत्न संजय चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नवनाथराव चव्हाण मित्र मंडळाचे सदस्य प्रविण चव्हाण,अमोल राठोड, बाल्या राठोड ,योगेश राठोड, किशोर राठोड यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन अतुल राठोड यांनी केले तर आभार विजयकुमार चव्हाण यांनी मानले.




### २०३० सालापर्यंत भारतात सुमारे १०,००० मुलींना मिळणार स्टेम शिक्षण

पुणे (स. गांवकरी) : AXA ने आज आपली स्टेम (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनियरिंग आणि मॅथेमॅटिक्स) शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी जपत, आपल्या "डेअर टू थ्राईव" उपक्रमांतर्गत २०३० साला पर्यंत भारतातील वंचित पार्श्वभूमी असलेल्या १०,००० मुलींना याचा लाभ मिळवून देण्याची घोषणा केली. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेस, या क्षेत्रातील भागीदार आणि एनजीओ'ज चा मदतीने तरूण मुलींपर्यंत पोहोचून त्यांना स्टेम शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देऊ करेल, ज्याकरिता विविध शिष्यवृत्ती अनुदान, संगणक प्रयोशाळा निर्मीती आणि डेक्स्टॉप संगणकांचे वाटप अशा काही गोष्टी करण्याचा त्यांचा मानस आहे. कंपनीने आजच आपली पुण्यातील फ्रेन्ड्स युनियन फ़ॉर इंजिनियरिंग (FUEL) नामक संस्थेसह झालेली भागीदारी देखील जाहिर केली, ज्यांचा माध्यमातून AXA समूहाला झालेल्या ४० वर्षांचा आनंद साजराकरण्याकरिता बेंगलुरू आणि पुण्यातील ४० मुलींना स्टेम शिक्षणाकरिता सहाय्य केले जाईल. गेल्याकाही वर्षात AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेसने सुमारे २,५०० मुलींना औद्योगिक भागीदारीचा माध्यमाने भक्कम असा आधार देऊन सबळ बनविले आहे आणि यापुढे देखील या दिशेने अधिक जोमाने कार्य करण्याचे ठरविले आहे. " "डेअर टू थ्राईव" उपक्रमाची सुरवात AXA समूहाचा कार्यकारी समूहाचे चीफ़ ऑपरेटिंग ऑफ़िसर आणि सीईओ ॲलेक्झॅन्डर व्होलर्ट, बेंगलुरू मधील फ़्रान्स काऊन्सिलचे जनरल मार्क लॅमी आणि AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेसचा सीईओ मिशेल रोशफ़ोर्ट यांनी AXA GBS चा बेंगलुरू कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात केली.

# 'बळी पहाट' मोठ्या उत्साहात; सांस्कृतिक कार्यक्रमातून इतिहासाची उजळणी

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**




आपण समाजाचे देणे लागतो. समाजामध्ये वावरत असताना प्रबोधन व परिवर्तन झाले पाहिजे या उद्देशाने शेती संस्कृती, कृषी संस्कृती जपणाऱ्या, शेतकरी-कष्टकरी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा, मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा व इतिहासाचा वेध घेण्यासाठी ओबीसी संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तूत मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा सांस्कृतिक "बळी पहाट" कार्यक्रम २२ ऑक्टोबर २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील चौधर पाडा येथे शेकडो नागरिकांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे लेखक दिग्दर्शक, निवेदक प्रमोद जाधव यांनी बोलताना सांगितले की "बळीराजाच्या बाबतीत भाबड कथांवर विश्वास न ठेवता खऱ्या इतिहासाचा शोध घेणे गरजेचे आहे." तुकोबारायांच्या अभंगांचा दाखला देत त्यांनी बळीराजाच्या स्मृतींना उजाळा दिला. सादरीकरणातून शेतकरी वर्गाचे दुःख व संघर्ष, "बळीचे राज्य" येण्याची लोकांची आस, तसेच शिवराय–संभाजी महाराज, जिजाऊ, महात्मा फुले,सावित्रीबाई, रमाई, राजश्री शाहू महाराज यांच्या कार्याचे स्मरण, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या स्वातंत्र्य–न्याय–समता–बंधुभावाच्या मूल्यांचा जागर करण्यात आला. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच ओबीसी समाजाने आपले अधिकार संघटितपणे मागणे आवश्यक आहे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमातून ओबीसी जनजागृती हा मुख्य विषय मांडण्यात आला. ओबीसींचे आरक्षण कशाप्रकारे संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर जातनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित करत, सामाजिक न्याय आणि हक्कांच्या लढ्यासाठी ती किती आवश्यक आहे हे प्रभावीपणे मांडण्यात आले. गेल्या दहा वर्षांपासून ओबीसी संघर्ष समिती रस्त्यावर उतरून ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर लढा देत आहे. समाजाला त्यांच्या संविधानिक हक्कांची जाणीव करून देण्यासाठी, शिक्षण–आरक्षण–राजकीय प्रतिनिधित्व या विषयांवर सतत जनजागृती करत आहे. "बळी पहाट" हा त्याच चळवळीचा एक विस्तार ठरला. "बळी पहाट" या कार्यक्रमाचे लेखन, दिग्दर्शन आणि निवेदन प्रमोद जाधव यांनी केले. निवेदक राजेंद्र पाटील, साधना भेरे, ज्योती दवणे, नीलम भोईर , साक्षी वाघेरे यांच्या प्रभावी सादरीकरणाने कार्यक्रम रंगला, तर गायक अरुण गगे, दिनेश भोईर, संतोषी जाधव आणि रुपाली जाधव यांच्या मधुर आवाजाने वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. राजमाता जिजाऊ कलामंचच्या नृत्यकलाकारांनी सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. "बळी पहाट" हा केवळ मनोरंजन करणारा नव्हे, तर शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या संस्कृतीचा तसेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांचा वास्तवदर्शी दस्तऐवज ठरला. उत्कृष्ट नियोजन, विचारपूर्वक संहिता, प्रभावी सादरीकरण आणि सामाजिक आशय यामुळे हा सांस्कृतिक आविष्कार प्रेक्षकांच्या कमालीच्या पसंतीस उतरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयवंत पाटील, कुंडलिक पाटील, पंडित पाटील, योगेश पाटील, विनोद भोईर, राजेंद्र पाटील, अशोक पाटील, संदीप वाघेरे, अजय किरपण, शाम पाटील, रुपेश मांजे, दत्ता दवणे, तुषार शेलार आदी कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

# आयडीएफसी फर्स्ट बँकेला ३५२ कोटी रुपयांचा करोत्तर नफा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीच्या कालावधीकरिता विनालेखापरीक्षित केलेले आर्थिक निकाल प्रसिध्द केले आहे. बँकेने दुसऱ्या तिमाहीत ३५२ कोटी रुपयांचा करोत्तर नफा (पॅट) नोंदविला असून गतवर्षीच्या याच कालावधीच्या (वाय-ओ-वाय) तुलनेत त्यात तब्बल ७६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. टीप: कर्जे आणि ॲडव्हान्समध्ये विविध कर्ज पर्यायांचा समावेश आहे. एनआईएम हा आयबीपीसी आणि सेल-डाउनचा एकूण नफा आहे. प्रथम तिमाही वित्तीय वर्ष 26 मध्ये करोत्तर नफ्यामध्ये 495 कोटी रुपयांचा ट्रेडिंग नफा समाविष्ट आहे, तर व्दितीय तिमाही वित्तीय वर्ष 26 मध्ये 56 कोटी रुपयांचा ट्रेडिंग नफा होता. मुख्य (कोर) नफ्याचा आधारावर करोत्तर नफ्यामध्ये क्रमिक आधारावर वाढ झालेली आहे. भांडवली पर्याप्ततेमध्ये संबंधित तिमाही किंवा अर्ध वर्षाचा नफा समाविष्ट आहे.

# पद्मश्री राहिबाई पोपेरे यांची पारंपारीक अनोखी दिवाळी

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



आपले कार्य आणि ध्येय यांच्याशी एकनिष्ठ राहून किती नम्रपणे काम करता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे बीजमाता पद्मश्री राहिबाई सोमा पोपेरे होय .नुकताच दिवाळी सण देशभर उत्साहात साजरा करण्यात आला. दिवाळी हा देशातील सर्वात मोठा सण मानला जातो. या सणाच्या निमित्ताने घरोघरी लक्ष्मीचे पूजन होते. दारोदारी सडा रांगोळ्या व रोषणाई केली जाते. त्याचबरोबर पणत्या आणि दिव्यांनी संपूर्ण परिसर उजळून निघतो. अंधारावर प्रकाशानी विजय मिळवण्याचा हा दीपोत्सव असतो. देशातील सर्वात मोठा सण प्रत्येक घरी साजरा होतो. पद्मश्री राहिबाई पोपेरे यांनी सुद्धा दीपावली मोठ्या उत्साहात आपल्या राहते घरी कोंभाळणे , तालुका -अकोले, जिल्हा -अहिल्यानगर येथे साजरी केली. हा उत्सव साजरा करत असताना त्यांनी पारंपरिक बियाणे संवर्धन व त्याच्याशी असलेले आपले नाते किती घट्ट आहे याचे उत्तम उदाहरण घडवले. दिवा तर दारी लागलाच परंतु बियाणेरूपी दिवा आणि नुकतेच शेतात तयार झालेले बियाणे यांची सुंदर आरास तयार करून त्यांची पूजा राहीबाई व त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांनी केली. घरावरती तोरण सुद्धा भाताच्या लोम्ब्यांचे , लक्ष्मीपूजनासाठी , नागली , वरई , खुरसानी व इतर भाजीपाल्यांचे बियाणे शिस्तबद्ध पद्धतीने मांडलेले होते.

पूजेसाठी उत्कृष्ट पद्धतीने अस्सल गावठी बियाण्यांची मांडणी केलेली होती. या सर्व गोष्टींचे नीटनेटकेपणाने नियोजन केलेले होते.आपल्या कार्याशी आणि ध्येयाशी एकनिष्ठ राहून प्रत्येक सणवार सुद्धा तेवढ्याच तत्परतेने साजरा करता येतो याचे त्यांनी उत्तम उदाहरण जगाला दाखवून दिले आहे.

# डॉ. बबनराव टिळेकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**



साईनगरी शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे बी दि चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ सोहळ्याचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात राज्यातील अनेक गुणी व कार्यक्षम शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला.

शिक्षक हेच समाजाची आदर्श पिढी घडवणारे शिल्पकार असून, त्यांच्याच कार्याचा सन्मान करण्याच्या हेतूने फाउंडेशन तर्फे दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. यावर्षीचा हा मानाचा सोहळा शिर्डीत पार पडला.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विठ्ठलराव जपे, श्री. स्वरूप कापे, श्री. निखिल वामन व श्री. दीपक चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. मयूर ढोकचौळे व विश्वस्त श्री. अभिषेक तुपे यांनीही आपली उपस्थिती दर्शवली.

यावेळी डॉ. श्री बबनराव बाळासाहेब टिळेकर, दादापाटील राजळे महाविद्यालय आदिनाथनगर तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आणि अनेक आदर्श विद्यार्थी घडविल्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्यांच्या कार्याची दखल घेत समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतुक होत असून, या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला अधिक प्रेरणादायी अधिष्ठान मिळाले आहे.

या पुरस्काराबद्दल दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आप्पासाहेब राजळे तसेच लोकप्रीय आमदार मोनिकाताई राजळे, जि. प. सदस्य राहुल राजळे, दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे सचिव, श्री आर. जे. महाजन, प्राचार्य डॉ. श्री .राजधर टेमकर, प्र. प्राचार्य अशोकराव काळे, कार्यालयीन अधीक्षक श्री विक्रमराव राजळे, प्रा. डॉ.जनार्धन नेहूल, प्रा. मेहबूब तांबोळी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच पाथर्डी मधील शिक्षक मित्र प्राचार्य अशोकराव तुपे, प्राचार्य पांडुरंग गोसावी, डॉ. घुले राजकुमार घुले, प्रा. अरुण नेहूल या सर्वांनी भरभरून कौतुक केले.

# शब्दगंधमुळे सामाजिक प्रश्न मांडण्याची प्रेरणा : संपतदादा बारस्कर

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**




'साहित्यिकांशी आलेल्या संपर्कामुळे सामाजिक प्रश्न मांडण्याची प्रेरणा मिळाली असून शब्दगंध प्रामाणिकपणे चांगली माणसे जोडण्यासाठी प्रयत्नशील आहे, सातत्याने चालू असलेले साहित्यिक उपक्रम निश्चितच नवोदित साहित्यिकांना प्रेरणा देतात, त्यामुळे शब्दगंध च्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहूव असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपतदादा बारस्कर यांनी व्यक्त केले.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने कोहिनूर मंगल कार्यालयात दीपावली काव्यसंध्या व शब्दगंध स्मरणिका प्रकाशन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ कवी प्रा.चंद्रकांत कर्डक हे होते. विचारपिठावर दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब भोसले, मुख्याध्यापक शिवाजीराव लंके, शिवाजीराव विधाते, महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलुलकर, पुस्तक संकलक शब्बीर शेख, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे इ. मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना संपतदादा बारस्कर म्हणाले की, शब्दगंध मध्ये केवळ साहित्यिकांनाच विचारपीठ उपलब्ध करून देण्यात येत नाही तर आमच्यासारख्या समाज कार्यकर्त्यांनाही विचारांचे आदान प्रदान करण्यासाठी येथे संधी मिळते. सातत्याने शहरांमध्ये शब्दगंध उपक्रम राबवित असल्याने आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असुन शब्दगंध ला पाठबळ देऊ असे आश्वासन त्यांनी दिले.

अध्यक्षपदावरून बोलताना प्रा. चंद्रकांत कर्डक म्हणाले की, यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने शेतकरी,कष्टकरी अडचणीत सापडलेला आहे, अशाप्रसंगी लेखकांनी आपली लेखणी या विषयावर चालवली पाहिजे, सर्वांच्या सुखदुःखात लेखक, कवींना सहभागी होता आले पाहिजे,नव्याने लिहिणाऱ्यांनी वाचले पाहिजे. सामाजिक विचार करण्याची प्रवृत्ती वाढली पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने लेखक कवींकडून समाज प्रबोधनाचे काम घडू शकेल.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. संजय नगरकर म्हणाले की, सातत्यपूर्ण उपक्रमामुळे शब्दगंध ही साहित्यिक संस्था आता राज्यभर आपल्या कार्याचा ठसा उमटमत आहे, अनेक साहित्यिक मित्र याबद्दल चर्चा करत असतात, ही चर्चा ऐकून आनंद वाटतो. समाजाशी लेखक कवींनी नाळ जोडून घ्यायला हवी हा विचार येथे मिळतो.

मराठी भाषेच्या समृद्धीसाठी अशा छोट्या मोठ्या उपक्रमाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलूलकर यांनी केले.

यावेळी शिवाजीराव विधाते, बापूसाहेब भोसले, शिवाजीराव लंके, शब्बीरभाई शेख यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी केले तर शेवटी राज्य संघटक प्रा.डॉ.अशोक कानडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री शर्मिला गोसावी यांनी केले. सुरुवातीला शाहीर भारत गाडेकर व प्रशांत सूर्यवंशी यांनी प्रबोधनाची गीते सादर केली.

यावेळी झालेल्या काव्य संमेलनामध्ये डॉ. संजय बोरुडे,बाळासाहेब देशमुख, हौशीनाथ बोर्डे, राहुल शिंदे, सुजाता पुरी, विनय पिंपरकर, शिरीष जाधव,पी.एन. डफळ, ऋता ठाकूर, शरद धनपे, वर्षा भोईटे, बबनराव गिरी, सुरेखा घोलप,सुजाता पुरी, रूपचंद शिदोरे,रेखा दहातोंडे,कृष्णा वाळके, महेश ढवळे, गौरव भुकन,प्रबोधिनी पठाडे, दुर्गा कवडे, शुभम घोडके, समृद्धी सुर्वे यांनी आपल्या काव्यरचना सादर केल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश राऊत, दिशा गोसावी, भाग्यश्री राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. चंद्रकांत कर्डक यांच्या सुमधुर आवाजात कवितेने कार्यक्रमाचा समारोप झाला.